


महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक

# समर्थ गांवकरी

POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026

मंगळवार, दि. १७ फेब्रुवारी २०२६




मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे | नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ४ | वर्ष : ४थे | अंक : ०८७ | किंमत : ४ रूपये | Gmail : aklgavakari@gmail.com Gmail : punegavkari@gmail.com

## राज्य सरकारने थकीत शेतकरी कर्जदारांचा डेटा मागवला

### आगामी अर्थसंकल्पात कर्जमाफीबाबत मोठी घोषणा शक्य

**मुंबई : (समर्थ गांवकरी)**

राज्यातील शेतकऱ्यांच्या कर्जमाफीच्या प्रश्नावर राज्य सरकारने महत्त्वाची पावले उचलण्यास सुरुवात केली आहे. राज्य सरकारकडून राज्यातील सर्व बँकांना थकीत कर्जदार शेतकऱ्यांची सविस्तर माहिती शासनाच्या शिंदे समितीकडे पाठवण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. त्यामुळे आगामी अर्थसंकल्पीय अधिवेशनात शेतकऱ्यांसाठी काही सकारात्मक घोषणा होऊ शकतात, अशी चर्चा रंगू लागली आहे. विशेषतः थकीत कर्ज असलेल्या शेतकऱ्यांमध्ये या हालचालींमुळे आशेचे वातावरण निर्माण झाले आहे. जून 2025 पर्यंत थकबाकी असलेल्या शेतकऱ्यांची माहिती गोळा करण्याचे काम विविध जिल्हा बँकांमार्फत सुरू आहे. नाशिक जिल्हा बँकेनेही या प्रक्रियेत पुढाकार घेतला असून सुमारे 74 हजार शेतकऱ्यांची माहिती राज्य सरकारच्या अधिकृत पोर्टलवर अपलोड करण्यात आली आहे. उर्वरित शेतकऱ्यांची माहिती गोळा करण्याची प्रक्रिया अद्याप सुरू आहे. यामुळे संपूर्ण राज्यातील थकीत




कर्जदारांचा अचूक आकडा शासनासमोर येणार आहे. नाशिक जिल्हा बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अरविंद शिंदे यांनी यासंदर्भात माहिती देताना सांगितले की, राज्य शासनाच्या मदतीसाठी एक समिती गठीत करण्यात आली आहे. या समितीकडून 30 जून 2025 ते 30 सप्टेंबर 2025 या कालावधीतील थकबाकीदार शेतकऱ्यांची माहिती मागवण्यात आली आहे. जिल्ह्यातील सेवा सहकारी सोसायट्या, त्यांचे सचिव, बँकेचे तपास अधिकारी आणि शाखाधिकारी यांच्या माध्यमातून माहिती संकलन सुरू आहे. तसेच सहनिबंधक आणि निबंधक कार्यालयातील अधिकाऱ्यांचेही सहकार्य मिळत असल्याचे त्यांनी सांगितले.

# शाळांना दर्जा देणाऱ्या प्रमाणपत्रांना स्थगिती

## देवेंद्र फडणवीसांनी घेतली गंभीर दखल; उच्चस्तरीय चौकशीचे निर्देश

**मुंबई : (समर्थ गांवकरी)**

राज्याचे कर्तबगार नेते आणि माजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अकाली निधनाने महाराष्ट्रावर शोककळा पसरली होती. बारामती येथे झालेल्या विमान दुर्घटनेत अजित पवार यांच्यासह पाच जणांचा दुर्दैवी मृत्यू झाला. या घटनेने राज्याच्या राजकारणाला मोठा धक्का बसला. अपघाताची बातमी समोर येताच देशातील वरिष्ठ नेत्यांनी शोक व्यक्त केला. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह विविध पक्षांचे नेते आणि सामान्य कार्यकर्त्यांनीही दुःख व्यक्त केले. राज्यभरात शोकसभा घेण्यात आल्या आणि अजित पवार यांच्या कार्याची आठवण काढण्यात आली.

मात्र, या दुर्दैवी घटनेच्या दिवशीच मंत्रालयात एक धक्कादायक प्रकार घडल्याचे उघड झाले. अजित पवार यांनी थांबवून ठेवलेल्या काही फाईल्सवर त्यांच्या निधनानंतर सुमारे दुपारी चारच्या सुमारास सह्या करण्यात आल्याची माहिती समोर आली. त्यामुळे प्रशासनाच्या कामकाजावर



प्रश्नचिन्ह निर्माण झाले. शोकाकुल वातावरण असतानाच निर्णयप्रक्रिया पुढे ढकलण्याऐवजी ती गतीने पार पडल्याचे दिसून आले. या घटनेमुळे राजकीय वर्तुळात चर्चा रंगली आहे. याच दिवशी अल्पसंख्याक विकास विभागाने 75 शाळांना अल्पसंख्यांक दर्जाचे प्रमाणपत्र दिल्याचेही समोर आले. अजित पवार यांच्या निधनानंतर काही तासांतच ही प्रमाणपत्रे देण्यात आल्याचा आरोप आहे. विशेष म्हणजे, मागील वर्षी ऑगस्ट महिन्यापासून अशा प्रमाणपत्रांच्या वितरणावर स्थगिती लागू होती. तरीही अचानकपणे प्रमाणपत्रांचे वाटप झाल्यामुळे प्रशासनातील कार्यपद्धतीवर गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत.

या प्रकरणाची माहिती समोर येताच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तत्काळ दखल घेतली. संबंधित 75 शाळांना देण्यात आलेल्या अल्पसंख्यांक दर्जाच्या प्रमाणपत्रांना स्थगिती देण्याचा निर्णय घेण्यात आला. तसेच, या संपूर्ण प्रकरणाची उच्चस्तरीय अधिकाऱ्याकडून चौकशी करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. दोषी आढळणाऱ्यांवर कठोर कारवाई केली जाईल, असेही निर्देश देण्यात आल्याची माहिती विश्वसनीय सूत्रांकडून मिळत आहे.

दरम्यान, विरोधकांनी या प्रकारावर तीव्र संताप व्यक्त केला आहे. शोककाळात प्रशासनाने संवेदनशीलता दाखवायला हवी होती, असे मत व्यक्त केले जात आहे. अजित पवार यांच्या अपघाती निधनाच्या दिवशीच मंत्रालयात महत्त्वाचे निर्णय घेणे आणि स्थगिती असतानाही प्रमाणपत्रांचे वाटप करणे, हा प्रकार लाजिरवाणा असल्याची टीका करण्यात येत आहे. या प्रकरणामुळे सरकारची प्रतिमा मलिन झाल्याचा आरोपही विरोधकांनी केला आहे.

धक्कादायक बाब म्हणजे 28 जानेवारी रोजी दुपारी 3.09 वाजता, म्हणजेच अपघाताच्या दिवशीच पहिले प्रमाणपत्र देण्यात आले. त्यानंतर काही तासांत उर्वरित प्रमाणपत्रांचे वाटप झाल्याची माहिती आहे. यामुळे हा निर्णय पूर्वनियोजित होता का, असा प्रश्न उपस्थित होत आहे. संबंधित फाईल्सवर झालेल्या सह्या आणि प्रमाणपत्रांचे वाटप यामागील संपूर्ण प्रक्रिया तपासण्याची गरज असल्याचे प्रशासनातील काही सूत्रांचे म्हणणे आहे.

### गंभीर भूमिका घेत चौकशीचे आदेश

एकूणच, एका बाजूला राज्य शोकमग्न असताना दुसऱ्या बाजूला मंत्रालयातील या घडामोडींमुळे नवा वाद निर्माण झाला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या प्रकरणी गंभीर भूमिका घेत चौकशीचे आदेश दिले असले तरी, पुढील कारवाई काय होते याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. अजित पवार यांच्या निधनाने निर्माण झालेल्या पोकळीतून राज्य सावरत असताना प्रशासनातील या प्रकारामुळे राजकीय वातावरण पुन्हा तापले आहे. आता चौकशी अहवालानंतरच या प्रकरणातील सत्य समोर येणार आहे.

# लग्नापूर्वी शारीरिक संबंध कसे?

### कदाचित आम्ही जुन्या विचारांचे असू, पण मुलगा-मुलगी अनोळखी असतात, विश्वास ठेवू नये

**नवी दिल्ली: (समर्थ गांवकरी)**

सर्वोच्च न्यायालयाने सोमवारी बलात्काराच्या आरोपांशी संबंधित एका प्रकरणात लग्नापूर्वीच्या शारीरिक संबंधांवर आश्चर्य व्यक्त केले. न्यायमूर्ती बी.व्ही. नागरत्ना म्हणाल्या की, आम्हाला हे समजत नाही की एक मुलगा आणि मुलगी लग्नापूर्वी शारीरिक संबंध कसे ठेवू शकतात.

न्यायमूर्ती नागरत्ना म्हणाल्या- कदाचित आम्ही जुन्या विचारांचे असू, पण लग्नापूर्वी मुलगा आणि मुलगी अनोळखी असतात. तुम्ही खूप सावध राहायला हवे. लग्नापूर्वी कोणावरही विश्वास ठेवू नये.

न्यायमूर्ती नागरत्ना यांच्यासोबत न्यायमूर्ती उज्ज्वल भुइयां यांचे खंडपीठ एका व्यक्तीच्या जामीन अर्जावर सुनावणी करत होते, ज्याच्यावर एका महिलेशी लग्नाचे वचन देऊन शारीरिक संबंध ठेवल्याचा आरोप आहे. आरोप आहे की तो व्यक्ती आधीच विवाहित होता आणि नंतर त्याने दुसऱ्या महिलेशी लग्न केले. सरकारी वकिलांच्या म्हणण्यानुसार, सुमारे 30 वर्षीय तरुणीची 2022 मध्ये एका मॅट्रिमोनियल साइटवर एका व्यक्तीशी भेट झाली होती. आरोप आहे की त्या



व्यक्तीने तरुणीशी लग्नाचे वचन देऊन दिल्लीत आणि नंतर दुबईत तिच्याशी अनेक वेळा शारीरिक संबंध ठेवले.

तरुणीने दावा केला आहे की, त्या व्यक्तीच्या सांगण्यावरून ती दुबईला गेली होती. तिथे तिच्या संमतीशिवाय आरोपीने अश्लील व्हिडिओ रेकॉर्ड केले आणि विरोध केल्यावर ते व्हायरल करण्याची धमकी दिली. नंतर तक्रारदार महिलेला कळले की त्या व्यक्तीने 19 जानेवारी 2024 रोजी पंजाबमध्ये दुसरे लग्न केले होते.

न्यायमूर्ती नागरत्ना यांनी प्रश्न विचारला की, ती तरुणी त्या व्यक्तीला भेटायला दुबईला का गेली. जेव्हा सरकारी वकिलांनी सांगितले की दोघे लग्नाचे नियोजन करत होते, तेव्हा न्यायमूर्ती म्हणाल्या- जर महिला लग्नाबाबत इतकी गंभीर होती, तर तिने लग्नापूर्वी दुबईला जायला नको होते.

न्यायमूर्ती नागरत्ना म्हणाल्या- हे असे प्रकरण नाही ज्यात खटला चालवून शिक्षा दिली जावी. कारण संबंध परस्पर संमतीने प्रस्थापित झाले होते. न्यायालयाने दोन्ही पक्षांना मध्यस्थीसाठी पाठवण्याचा सल्ला दिला. या प्रकरणाची सुनावणी आता बुधवारी होईल.

## संभाजीनगरचे ठाकरेंचे पदाधिकारीही शिंदेसेनेच्या वाटेवर

**मुंबई: (समर्थ गांवकरी)**

राज्यातील जवळपास सर्वच प्रमुख निवडणुका पार पडल्या असून स्थानिक स्वराज्य संस्थांचे निकालही जाहीर झाले आहेत. त्यामुळे पुढील तीन वर्षे सत्ताधाऱ्यांनी विकासकामांवर लक्ष केंद्रित करणे आणि विरोधकांनी सरकारला कामावरून जाब विचारणे, हीच अपेक्षा राजकीय वर्तुळात व्यक्त होत आहे. मात्र निवडणुका संपल्यानंतरही पक्षप्रवेश आणि पक्षांतराचा सिलसिला थांबलेला दिसत नाही. शिवसेनेचे मुख्य नेते आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नांदेड जिल्ह्यातील माजी आमदार शंकरअण्णा धोंडगे यांनी आपल्या समर्थकांसह शिवसेनेत प्रवेश केला. नांदेडमधील या पक्षप्रवेशाने राजकीय चर्चांना उधाण आले आहे. तसेच संभाजीनगर जिल्ह्यातील उबाठा गटातील काही पदाधिकारी आणि कार्यकर्तेही लवकरच शिवसेनेत दाखल होणार असल्याची माहिती देण्यात आली आहे. त्यामुळे निवडणुका संपल्यानंतरही राज्यातील राजकीय घडामोडी थांबलेल्या नाहीत, हे स्पष्ट झाले आहे.



आगामी काळात आणखी काही नेते आणि कार्यकर्ते सत्ताधारी पक्षात प्रवेश करतील, अशी शक्यता व्यक्त होत आहे. शिवसेनेत प्रवेश करताना शंकर अण्णा धोंडगे यांनी आपली भूमिका स्पष्ट केली. आम्ही डावे-उजवे सर्व पर्याय पाहिले. मात्र दिलदार मनाचा आणि कार्यकर्त्यांशी नातं जपणारा नेता म्हणजे एकनाथ शिंदे. त्यामुळे आम्ही शिवसेना पक्षात प्रवेश करण्याचा निर्णय घेतला, असे त्यांनी सांगितले. त्यांच्या या वक्तव्यामुळे कार्यक्रमस्थळी उपस्थित कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण होते. या वेळी बोलताना एकनाथ शिंदे यांनी दिवंगत शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारांचा उल्लेख केला. आम्ही बाळासाहेबांचे विचार घेऊन पुढे चाललो आहोत.









# शिर्डीत ‘साईकृपा आयुर्वेदिक’ दुकान सील

## बोगस आयुर्वेदिक औषध विक्रेत्यांवर कारवाईची मागणी तीव्र

**शिर्डी : (समर्थ गांवकरी)**

साई भक्तांची फसवणूक केल्याच्या तक्रारीनंतर शिर्डी शहरातील ताजीम खान बाबा चौक परिसरात असलेले ‘साईकृपा आयुर्वेदिक’ दुकान प्रशासनाने तात्काळ सील केले आहे. आयुर्वेदिक उपचारांच्या नावाखाली भाविकांकडून अवाजवी दर आकारणे आणि संशयित औषधांची विक्री केल्याचा आरोप या दुकानावर करण्यात आला होता. या कारवाईनंतर शिर्डीत बोगस आयुर्वेदिक दुकानांविरोधात संतापाची लाट उसळली असून ग्रामस्थ व वैद्यकीय क्षेत्रातून कठोर कारवाईची मागणी होत आहे.

साई भक्तांकडून वारंवार येणाऱ्या तक्रारींची दखल घेत प्रशासनाने तपास केला. तपासादरम्यान आयुर्वेदिक उपचारांच्या नावाखाली अवाजवी दर आकारणे, ठोस वैद्यकीय पुरावे नसलेली औषधे विकणे तसेच भाविकांना दिशाभूल करणाऱ्या दाव्यांचा वापर केल्याचे प्रकार समोर आल्याची माहिती मिळाली. त्यानंतर संबंधित दुकानावर छापा टाकून ते सील करण्यात आले.

शिर्डीत दररोज हजारो भाविक येत असल्याने श्रद्धेचा गैरफायदा घेत काही जण आयुर्वेदिक उपचारांच्या नावाखाली फसवणूक करत असल्याची चर्चा आहे. “असाध्य आजार झटपट बरे होतील”, “विशेष गुप्त औषध” अशा जाहिराती दाखवून भाविकांना गंडा घालण्याचे प्रकार वाढल्याचे स्थानिकांनी सांगितले.

या प्रकरणानंतर ग्रामस्थांनी तीव्र संताप व्यक्त करत, केवळ ‘साईकृपा आयुर्वेदिक’ नव्हे तर अशा प्रकारे फसवणूक करणारी सर्व दुकाने कायमस्वरूपी बंद करण्याची मागणी केली आहे. शिर्डीची प्रतिमा मलीन होऊ नये आणि भाविकांची लूट थांबावी, यासाठी व्यापक मोहीम राबवण्याची मागणीही पुढे आली आहे.

राहाता तालुका डॉक्टर असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. नचिकेत वर्पे यांनीही या प्रकाराबाबत तीव्र चिंता व्यक्त केली आहे. आयुर्वेदिक औषधांच्या नावाखाली बनावट किंवा अप्रमाणित उत्पादने विकणाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, अन्यथा यामुळे लोकांच्या आरोग्याशी गंभीर खेळ होऊ शकतो, असे त्यांनी स्पष्ट केले. तसेच अधिकृत परवाना नसलेल्या दुकानांची तपासणी करून दोषींवर गुन्हे दाखल करावेत, अशी मागणी त्यांनी प्रशासनाकडे केली आहे.

प्रशासन आणि वैद्यकीय तज्ज्ञांनी शिर्डीत येणाऱ्या साई भक्तांना काही महत्त्वाच्या सूचना दिल्या आहेत :




### पुढील कारवाईकडे लक्ष

‘साईकृपा आयुर्वेदिक’ दुकान सील झाल्यानंतर आता शिर्डीतील इतर आयुर्वेदिक व औषध विक्री केंद्रांची तपासणी होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. प्रशासनाकडून विशेष मोहीम राबवून बोगस औषध विक्री रोखण्यासाठी उपाययोजना केल्या जाणार असल्याची माहिती सूत्रांकडून मिळत आहे. श्रद्धेचे केंद्र असलेल्या शिर्डीत भाविकांची फसवणूक होऊ नये, यासाठी प्रशासन, वैद्यकीय क्षेत्र आणि ग्रामस्थ यांची एकत्रित भूमिका महत्त्वाची ठरणार आहे.

- परवानाधारक दुकानाची खात्री करा – औषधे घेताना दुकान अधिकृत आहे का ते तपासा.
- पावती घ्या – प्रत्येक खरेदीसाठी पक्की बिल घ्यावी.
- भ्रामक जाहिरातींना बळी पडू नका – “तत्काळ बरे होईल” अशा दाव्यांपासून सावध राहा.
- तक्रार नोंदवा – फसवणूक झाल्यास तात्काळ शिर्डी पोलीस स्टेशन किंवा मंदिर प्रशासनाशी संपर्क साधा.

या कारवाईमुळे प्रामाणिकपणे व्यवसाय करणाऱ्या आयुर्वेदिक दुकानदारांवरही परिणाम होण्याची शक्यता आहे. मात्र श्रद्धा आणि आरोग्याशी खेळणाऱ्यांवर कठोर कारवाई करणे आवश्यक असल्याचे प्रशासनाचे मत आहे.

## श्री क्षेत्र घुटकेश्वर महादेव मंदिर वाकडपाडा येथे महाशिवरात्री निमित्त भाविकांची गर्दी

**पालघर (समर्थ गांवकरी)**

मोखाडा तालुक्यातील वाकडपाडा येथील प्राचीन शिवमंदिरात श्री घुटकेश्वर महादेवाचे दर्शन घेण्यासाठी परीसरातील भाविकांनी आज सकाळपासून च गर्दी केली आहे. भजन किर्तन स्वाध्याय परिवार कार्यक्रमाचे आयोजन मंदिर समितीने केले असल्याची माहिती घुटकेश्वर महादेव मंदिर समितीचे अध्यक्ष प्रदीप वाघ यांनी सांगितले.

सकाळी परीसराती दिंड्या हरहर महादेव चा जयघोष करत या तिर्थक्षेत्रात येतात, भाविकांच्या जयघोषात महाअभिषेक, महाआरती करण्यात आल्याने आज घुटकेश्वर मंदीराचा परीसर शिवमय झाला होता. हे तिर्थक्षेत्र प्राचिन काळापासून चे आहे, महाराष्ट्र शासनाच्या तिर्थक्षेत्र विकास योजनेतून या ठिकाणी अनेक विकासकामे करण्यात आली असल्याची माहिती समिती चे अध्यक्ष प्रदीप वाघ यांनी दिली आहे का आज परीसरातील अनेक व्यावसायिकांनी फराळ,खेळणी,गृह उपयोगी वस्तू चे स्टॉल लावण्यात आले होते त्यामुळे यात्रेच्या निमित्ताने आलेल्या भाविकांनी खरेदीचा आनंद देखील घेतला.



## महादेव मंदिरात भाविकांची गर्दी

**कळवण: (समर्थ गांवकरी)**

कळवण तालुक्यातील सिरसमणी, ओतूर, कुंडाणे (ओ) आणि पिंपरी या गावांमध्ये महाशिवरात्रीच्या पावन पर्वानिमित्त महादेव मंदिरांमध्ये भाविकांची अभूतपूर्व गर्दी. पहाटेपासूनच ‘ॐ नमः शिवाय’च्या जयघोषाने मंदिर परिसर दुमदुमून गेला होता. महाशिवरात्री हा भगवान शंकराच्या आराधनेचा अत्यंत महत्त्वाचा दिवस. या दिवशी उपवास, रात्रजागरण, अभिषेक, बेलपत्र अर्पण आणि महाआरती यांचे विशेष महत्त्व असते. याच पार्श्वभूमीवर पहाटे चार वाजल्यापासूनच भाविकांनी दर्शनासाठी रांगा लावल्या होत्या. महिलावर्ग, युवक, ज्येष्ठ नागरिक तसेच लहान मुलांचा उत्साह पाहण्यासारखा होता.

## उघड्या खड्ड्यामुळे संताप; स्विफ्ट कारचा अपघात!

**नवी मुंबई : (समर्थ गांवकरी)**

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (एमआयडीसी) परिसरातील सेंट्रल एमआयडीसी रोडलगत सुरू असलेल्या कामामुळे स्थानिक नागरिकांमध्ये संतापाची भावना व्यक्त होत आहे. काम अत्यंत संथ गतीने सुरू असून रस्त्याच्या कडेला मोठा खड्डा उघडाच ठेवण्यात आला आहे. विशेष म्हणजे संबंधित ठिकाणी यू-टर्न अगदी बाजूलाच असल्याने वाहनांची वर्दळ मोठ्या प्रमाणावर असते. मात्र, काम सुरू असल्याची कोणतीही पूर्वसूचना देणारे फलक, प्रतिबंधक बॅरिकेड्स किंवा रात्रीसाठी इशारा दिवे लावण्यात आलेले नाहीत. परिणामी वाहतूक सुरक्षेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. या निष्काळजीपणामुळे एका स्विफ्ट कारचा अपघात झाल्याची घटना समोर आली आहे. यू-टर्न घेताना चालकाला खड्ड्याचा अंदाज न आल्याने वाहनाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. सुदैवाने जीवितहानी टळली असली, तरी भविष्यात मोठी दुर्घटना घडण्याची शक्यता नाकारता येत नाही. नागरिकांनी प्रश्न उपस्थित केला आहे की, या प्रकरणात नवी मुंबई महानगरपालिका आणि एमआयडीसी प्रशासन संबंधित ठेकेदारावर जबाबदारी निश्चित करून कारवाई करणार का? तसेच तातडीने सुरक्षिततेच्या उपाययोजना करून नागरिकांच्या जीवाशी खेळ थांबवणार का? तात्काळ खड्डा बुजवावा किंवा सुरक्षित बॅरिकेड्स उभारावेत.

योग्य दिशादर्शक फलक व रात्रीसाठी रिफ्लेक्टर दिवे लावावेत. संबंधित ठेकेदारावर दंडात्मक कारवाई करावी. अन्यथा भविष्यात एखादी गंभीर दुर्घटना घडल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी प्रशासनावरच राहील, अशी तीव्र प्रतिक्रिया नागरिकांकडून व्यक्त होत आहे.



## ऐतिहासिक आठवणी जपणाऱ्या हिराबाई सोनावणे यांचे निधन

- पाणी सत्याग्रह आणि समतानगरमधील भेटीच्या आठवणींची साक्षीदार काळाच्या पडद्याआड
- परिसरात शोककळा

**भिवंडी : (समर्थ गांवकरी)**

भिवंडी तालुक्यातील येथील समतानगर परिसरात यांच्या ऐतिहासिक भेटीच्या आठवणी जपणाऱ्या आणि त्या घटनेच्या एकमेव साक्षीदार असलेल्या हिराबाई दुंदांजी सोनावणे (वय ९६) यांचे शनिवार, १४ फेब्रुवारी रोजी दुपारी १२.३० वाजता निधन झाले. त्यांच्या निधनामुळे समतानगर व परिसरात शोककळा पसरली असून सामाजिक, राजकीय आणि आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्त्यांकडून हळहळ व्यक्त करण्यात येत आहे. हिराबाई सोनावणे या पडघ्यातील सतीच्या विहिरीवर झालेल्या ऐतिहासिक पाणी सत्याग्रहाच्या आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या भेटीच्या जिवंत साक्षीदार होत्या. त्यांनी अनेक वेळा आपल्या आठवणी सांगताना नमूद केले होते की, त्या लहान असताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर पडघ्यात आले होते. सतीच्या विहिरीवर त्यांनी पाणी सत्याग्रह केला होता आणि त्यांच्यासोबत अनेक कार्यकर्ते उपस्थित होते. या सत्याग्रहामुळे सामाजिक समतेचाआणि हक्कांच्या लढ्याचा संदेश परिसरात पोहोचला होता. त्यावेळी पडघा येथील एका शिसवीच्या झाडाखाली डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सभा घेतली होती. या सभेत त्यांनी नागरिकांना आपल्या मुलांना शिक्षण देण्याचे आवाहन केले होते. "शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा" या त्यांच्या विचारांचा प्रभाव त्या काळात पडघा परिसरातील नागरिकांवर झाला होता. पडघ्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकर आले होते. समतानगर येथील काशिनाथ हाशाबा दोंदे यांच्या घरी डॉ. बाबासाहेब आंबेडकर चहापाण्यासाठी थांबले होते. ही बातमी त्या काळात संपूर्ण परिसरात वाऱ्यासारखी पसरली होती. या ऐतिहासिक घटनेच्या आठवणी समतानगर येथिल पत्रकार मिलिंद जाधव यांना हिराबाई दुंदाजी सोनावणे यांनी अनेकदा सांगितल्या होत्या. त्यांच्या या आठवणींवर आधारित अनेक बातम्या आणि लेखही मिलिंद जाधव यांनी प्रसिद्ध केले होते. हिराबाई सोनावणे यांच्या निधनानंतर त्यांच्या पार्थिवावर समतानगर येथील बौद्ध स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या अंत्यविधीसाठी परिसरातील नागरिक, सामाजिक कार्यकर्ते आणि विविध राजकीय क्षेत्रातील नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थित होते. दरम्यान, त्यांच्या स्मरणार्थ रविवार, २२ फेब्रुवारी रोजी सकाळी ११.३० वाजता समतानगर, पडघा येथील त्यांच्या राहत्या घरी पुण्यानुमोदन कार्यक्रम आणि आदरांजली सभा आयोजित करण्यात आली आहे.

हिराबाई सोनावणे यांच्या निधनामुळे पडघा परिसराने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या ऐतिहासिक भेटीच्या आठवणी सांगणारा एक महत्त्वाचा साक्षीदार गमावला असून, त्यांच्या आठवणी इतिहासाचा अमूल्य ठेवा म्हणून कायम स्मरणात राहतील.



## ऑन जॉब ट्रेनिंगसाठी निवड

**बेल्हे : (समर्थ गांवकरी)**

समर्थ रुरल एज्युकेशनल इन्स्टिट्यूट संचलित,समर्थ औद्योगिक प्रशिक्षण संस्था (ITI), बेल्हे येथील विविध ट्रेड्समधील एकूण ६३ विद्यार्थ्यांची बजाज ऑटो लि.चाकण या कंपनीमध्ये ऑन जॉब ट्रेनिंग (OJT) साठी निवड झाल्याची माहिती उपप्राचार्य विष्णू मापारी यांनी दिली. या निवडीमुळे विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष उद्योगातील कामाचा अनुभव मिळणार असून त्यांच्या कौशल्यविकासाला मोठी चालना मिळणार आहे.औद्योगिक प्रशिक्षणाच्या अभ्यासक्रमाचा भाग म्हणून राबविण्यात येणाऱ्या ऑन जॉब ट्रेनिंगमुळे विद्यार्थ्यांना आधुनिक यंत्रसामग्री,उत्पादन प्रक्रिया,सुरक्षितता नियम तसेच कार्यसंस्कृती यांचा प्रत्यक्ष अनुभव घेता येणार आहे.प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर रोजगाराच्या संधी अधिक व्यापक होणार असल्याचे मत प्राचार्य पांडुरंग हाडवळे यांनी व्यक्त केले.

## निकृष्ट दर्जाचे काम बंद करा : रविंद्र राजदेव

**टाकळी ढोकेश्वर (समर्थ गांवकरी)**

नगर कल्याण हायवे चे काम सध्या कॉंक्रीटीकरणचे काम चालू आहे ,परंतु ते काम निकृष्ट दर्जाचे चालू आहे , ट्राफिक झाली तरी गार्ड ची सुविधा नाही ,कुठे सूचना फलक नाही त्यामुळे परवा काळेवाडी येथे अपघात होऊन एका युवकाचा मृत्यू झाला याला जबाबदार कोण असा प्रश्न ग्रामस्थाकडून उपस्थित होत आहे. टाकळी परिसरात रस्त्याचं काम चालू असतानाच रस्त्याला चिरा गेलेल्या आहेत ,कॉंक्रिट टाकल्यावर त्याला पाणी पुरेशा प्रमाणात मारले जात नसल्याचा आरोप रविंद्र राजदेव यांनी केला ज्या शेतकऱ्यांची जमीन रस्त्यात गेलेली आहे ,खासदार लोकनेते निलेश लंके साहेब यांनी अधिकाऱ्यांना शेतकऱ्यांचे नुकसान भरपाई द्यायला सांगून दोन महिने झाले तरी आणखी प्रशासनाने नुकसान भरपाई दिलेली नाही. ह्या कामात येत्या दोन दिवसात सुधारणा झाली नाही तर निलेश लंके प्रतिष्ठानचे तालुका उपाध्यक्ष रविंद्र राजदेव आणि टाकळी ढोकेश्वर चे सामाजिक कार्यकर्ते महेश झावरे यांनी आंदोलनाचा इशारा दिला आहे.



## सभापती प्रा. राम शिंदे यांच्याकडून तापकीर कुटुंबियांचे सांत्वन



**मिरजगाव: (समर्थ गांवकरी)**

कर्जत तालुक्यातील खांडवी येथे कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती काकासाहेब तापकीर यांच्या निवासस्थानी रविवारी, दि.१५ रोजी महाराष्ट्र विधानपरिषदेचे सभापती ना.प्रा. राम शिंदे यांनी सांत्वनपर भेट देवून कुटुंबियांचे सांत्वन केले.

कर्जत तालुका कृषी बाजार समितीचे सभापती काकासाहेब तापकीर यांच्या मातोश्री कै.पार्वती लक्ष्मण तापकीर (वय - ९६) यांचे नुकतेच वृद्धापकाळाने दुःखद निधन झाले. रविवारी विधानपरिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांनी तापकीर यांच्या निवासस्थानी जाऊन विचारपूस करून या कुटुंबियांचे सांत्वन केले. यावेळी भाजपाचे ज्येष्ठ नेते शांतीलाल कोपनर, कर्जतचे उपनगराध्यक्ष संतोष म्हेत्रे, भाजपा तालुकाध्यक्ष अनिल गदादे, माजी पंचायत समिती सदस्य डॉ.पंढरीनाथ गोरे, अशोक खेडकर, शेखर खरमरे, संपत बावडकर, सरपंच प्रविण तापकीर, नंदलाल काळदाते, लक्ष्मण तापकीर, भाऊसाहेब गावडे, हरिदास केदारी आदी उपस्थित होते. तसेच विविध क्षेत्रातील मान्यवरांनी निवासस्थानी येऊन सांत्वनपर भेटी दिल्या.

## जामखेडमध्ये 'एमडी' (मेफेड्रॉन) ड्रग्ज पकडले, गुन्हा दाखल

**जामखेड : (समर्थ गांवकरी)**

मोठ्या शहरातील ड्रग्ज लोन आता ग्रामिण भागापर्यंत पोहचल्याचे पहायला मिळत आहे. नागरिकांच्या जीवितास धोका निर्माण करणारे रॅकेट जामखेड तालूक्यात सक्रिय असल्याचा पर्दाफाश झाला आहे. जामखेड शहराजवळील जामखेड कर्जत रोडवर एका फर्निचरच्या दुकानासमोर मोटारसायकल वरुन विक्री करण्यासाठी घेऊन जात असताना एक जणाकडुन 6.17 मिली ग्रॅम वजनाचे सव्वा लाख रुपये कीमतीचे मॅफेड्रॉन ड्रग्ज स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाच्या पथकाने जामखेड पोलीसांच्या मदतीने जप्त केले आहे. या प्रकरणी दोन जणांविरोधात जामखेड पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी आरोपी मंगेश हिरामन पवार, वय 30 वर्षे रा. कान्होपात्रा नगर, जामखेड व मकसुद बागवान (पुर्ण नाव माहित नाही) रा. करमाळा जिल्हा. सोलापुर आशा दोन जणांविरोधात जामखेड पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मोठ्या शहरातील ड्रग्ज चे लोन आता ग्रामिण भागापर्यंत पोहचल्याचे वरील घटनेवरून पहायला मिळत आहे. कारण जामखेड सारख्या ग्रामिण भागात ड्रग्ज विक्री होत असल्याचे या घटनेवरून समोर येत आहे. स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला मिळालेल्या गुप्त माहिती नुसार शनिवार दि 14 फेब्रुवारी 2026 रोजी सकाळी आरोपी मंगेश हिरामन पवार वय 30 वर्षे रा. कान्होपात्रा नगर, जामखेड हा जामखेड शहराजवळील जामखेड कर्जत रोडवरील एका फर्निचरच्या दुकानासमोरुन पाठीमागे नंबर प्लेट नसलेल्या व समोरच्या बाजूला मोटारसायकल क्र. एम. एच 16, डी. ई 1713 असा क्रमांक आसलेल्या मोटारसायकल वरुन चालला होता. यावेळी पोलिसांनी त्यास आडवुन त्याची तपासणी केली असता त्याच्या जवळ 6.17 मिली ग्रॅम वजनाचे 1 लाख 23 हजार 400 रुपये किमतीचा एका पांढऱ्या रंगाच्या छोट्या प्लास्टिक पाऊच मध्ये असलेला मॅफेड्रॉन नावाचा अमली पदार्थ आढळून आला. याची आंतरराष्ट्रीय बाजारात 20 हजार रुपये प्रति ग्रॅम प्रमाणे किंमत आहे. सदर आरोपीकडुन 1 लाख रुपये कीमतीची मोटारसायकल व 1 लाख 23 हजार 400 रु किमतीचे ड्रग्ज असा एकुण 2 लाख 23 हजार 400 रुपये कीमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

या प्रकरणी स्थानिक गुन्हे शाखेचे पो. हे.कॉ. र्‍हदय गौतम घोडके यांनी दिलेल्या फिर्यादी वरून वरील दोन जणांविरोधात जामखेड पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हि कारवाई पोलिस अधिक्षक सोमनाथ घार्गे व उपविभागीय पोलीस अधिकारी प्रविणचंद लोखंडे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक किरणकुमार कबाडी व जामखेड पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक दशरथ चौधरी यांच्यासह पोलीस उपनिरीक्षक समीर अभंग राहुल द्वारके, गणेश लबडे, संतोष खैरे, पोलीस नाईक शामसुंदर जाधव, भीमराज खडसे, पोलीस कॉन्स्टेबल भाऊसाहेब काळे, अमोल कोतकर, सुनील मालकर, चालक अरुण मोरे, महादेव मिसाळ यांच्या पथकाने केली आहे. पुढील तपास पोलीस निरीक्षक दशरथ चौधरी हे करित आहेत.



# गायमुख देवस्थान येथे २६ वर्षांची अन्नदान परंपरा; लाखो भाविकांची उपस्थिती!

- पाच दिवसांमध्ये सात ते आठ लाख भाविकांची दर्शनासाठी उपस्थिती!
- अन्नदानाचा लाभ भाविकांना मिळतो, हीच आमच्या आयुष्यातील पुण्याई – नानजीभाई ठक्कर








कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दीपक सूचक यांनी केले, तर आभार प्रदर्शन गोपाल अग्रवाल यांनी मानले. गायमुख देवस्थानातील अन्नदानाची ही अखंड परंपरा विदर्भातील धार्मिक आणि सामाजिक एकात्मतेचे प्रतीक ठरत असून भाविकांच्या सेवेतून समाजकार्याचा आदर्श घालून देत आहे.

**तुमसर (जि. भंडारा) : (समर्थ गांवकरी)**

संपूर्ण हिंदुस्थानात महाशिवरात्रीचा उत्सव उत्साहात साजरा होत असताना भंडारा जिल्ह्यातील तुमसर तालुक्यातील गायमुख देवस्थान येथे गेल्या २६ वर्षांपासून सुरू असलेला अन्नदान उपक्रम यंदाही मोठ्या भक्तिभावाने पार पडला. गेल्या तीन दिवसांत भाविकांसाठी राबविण्यात आलेल्या या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

या प्रसंगी थोर समाजसेवक नानजीभाई खिमजीभाई ठक्कर ठाणावाला यांनी उपस्थितांना संबोधित करताना सांगितले की, हा उपक्रम यापुढेही अखंडित सुरू राहावा यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले जातील. सामाजिक आणि शैक्षणिक कार्यात अग्रेसर असलेल्या एनकेटी ग्रुपमार्फत विदर्भातील विविध भागांत सातत्याने सहकार्य करण्यात येत असून, भविष्यातही सामाजिक हित डोळ्यासमोर ठेवून कार्य सुरू राहील, असा आशावाद त्यांनी व्यक्त केला. "एनकेटी कोणतीही निवडणूक लढवत नाही; आम्ही केवळ सामाजिक आणि शैक्षणिक कार्यासाठी कटिबद्ध आहोत," असेही त्यांनी स्पष्ट केले.

भंडारा, गोंदिया, गडचिरोली, नागपूर तसेच अमरावतीसह विदर्भातील विविध जिल्ह्यांतून चार ते पाच दिवसांत सुमारे चार ते पाच लाख भाविकांनी गायमुख देवस्थान येथे दर्शन घेतले. मंदिर प्रशासनाने सर्वांसाठी भोजनाची उत्तम व्यवस्था केली होती. यात्रेदरम्यान सुमारे ८०० ते ९०० पोलीस व होमगार्ड यांचा कडक बंदोबस्त ठेवण्यात आला होता. शासकीय अधिकारी, कर्मचारी तसेच शालेय विद्यार्थी स्वयंसेवकांनीही अन्नदान उपक्रमात सक्रिय सहभाग घेतला.

कैलाशी आश्रम, गायमुख येथे "नो दानपेटी" हा संदेश मनी बाळगून कोणाकडूनही जबरदस्तीची वर्गणी न घेता अन्नदान सुरू ठेवण्याचा संकल्प करण्यात आला आहे. "जो देगा उसका भला, न देगा उसका भी भला" या भावनेतून सुरू असलेला हा उपक्रम शेवटपर्यंत पुढे नेण्याचा निर्धार आयोजकांनी व्यक्त केला.

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस तथा दैनिक समर्थ गांवकरीचे संपादक डॉ. विश्वासराव आरोटे यांनी मनोगत व्यक्त करताना सांगितले की, "संपूर्ण देशात महाशिवरात्री एक-दोन दिवस साजरी केली जाते; मात्र गायमुख येथे चार-पाच दिवसांची यात्रा आणि अन्नदानाची भव्य परंपरा हे विशेष वैशिष्ट्य आहे." यावेळी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ व दैनिक समर्थ गांवकरीच्या वतीने अन्नदानासाठी दहा पोते तांदूळ देण्यात येणार असल्याची घोषणा करण्यात आली.

हे मंदिर राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या कार्यक्षेत्रातील असल्याचा उल्लेख करत, या देवस्थानाचा तीर्थक्षेत्र म्हणून शासनाने समावेश करावा, अशी मागणी करण्यात आली. त्यामुळे विदर्भातील पाच-सहा जिल्ह्यांतील भाविकांना अधिक सुविधा उपलब्ध होतील, असे मत मान्यवरांनी व्यक्त केले.

कार्यक्रमादरम्यान शिवशंभो महादेव मूर्तीची पूजा व ध्वजपूजन करण्यात आले. महिलांचा तसेच शासकीय अधिकाऱ्यांचा विशेष सन्मान करण्यात आला. उपस्थित पाहुण्यांचा शाल, पुष्पगुच्छ व हार देऊन सत्कार करण्यात आला. भाविकांनी नानजीभाई ठाणावाला यांचे पूजन करून फुलांची उधळण करत स्वागत केले.

"माझे स्वागत करण्यापेक्षा आलेल्या प्रत्येक भाविकाचे स्वागत करा; त्यांच्या नेत्रांतच परमेश्वराचे रूप आहे," असा भावनिक संदेश त्यांनी दिला.

# महाराजा जिवाजीराव शिंदे महाविद्यालयाच्या प्राचार्यपदी प्रो. डॉ. प्रकाश साळवे यांची नियुक्ती

**श्रीगोंदा : (समर्थ गांवकरी)**



रयत शिक्षण संस्थेच्या नामांकित महाराजा जिवाजीराव शिंदे महाविद्यालय, श्रीगोंदा येथे प्रभारी प्राचार्यपदी प्रो. डॉ. प्रकाश निवृत्ती साळवे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. यापूर्वी ते महाविद्यालयात उपप्राचार्य तसेच भूगोल विभागप्रमुख म्हणून कार्यरत होते.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात भूगोल विषयासाठी ते पीएच.डी. मार्गदर्शक म्हणून कार्य करीत असून संशोधनाभिमुख दृष्टिकोन असलेले अभ्यासक म्हणून त्यांची ओळख आहे. त्यांनी सहा ग्रंथांचे लेखन केले असून त्यांच्या नावावर दोन पेटंट नोंदविण्यात आले आहेत. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय मान्यताप्राप्त जर्नलमध्ये विविध विषयांवरील त्यांचे संशोधनपर लेख प्रकाशित झाले आहेत. तसेच अनेक राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय परिषदांमध्ये त्यांनी तज्ज्ञ म्हणून सहभाग नोंदविला आहे.

शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल त्यांना विविध पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे. 'विवेक वाहिनी' अंतर्गत वारसा व समाजसुधारक या विषयांवर त्यांनी समाजप्रबोधनपर व्याख्याने दिली आहेत. ते पर्यावरणप्रेमी म्हणूनही परिचित आहेत.

त्यांच्या नियुक्तीबद्दल महाविद्यालय विकास समितीचे चेअरमन तथा माजी मंत्री बबनराव पाचपुते, जिल्हा परिषद माजी अध्यक्ष बाबासाहेब भोस, मॅनेजिंग कौन्सिल सदस्य, महाविद्यालय विकास समितीचे सदस्य आमदार राहुलदादा जगताप, महावीर पटवा, कर्मवीर भाऊराव पाटील विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. ज्ञानदेव म्हस्के, परिक्रमा संकुल प्रमुख डॉ. प्रतिभाताई पाचपुते, उपनगराध्यक्ष सौ. अलकाताई अनभुळे, प्राचार्य दिलीप भुजबळ, माजी प्राचार्य डॉ. महादेव जरे, डॉ. अनिल घोडके, पत्रकार पीटर रणसिंग महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे जिल्हा सचिव व रयत संकुलातील सर्व शाखाप्रमुख, शिक्षणप्रेमी नागरिक, उपप्राचार्य, विभागप्रमुख, प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन करून भावी कार्यकाळासाठी शुभेच्छा दिल्या.

# दिपाली भगत यांचा प्रभागात वचनपुर्ती दौरा



**ठाणे : (समर्थ गांवकरी)**

'काम करत आलोय...काम करत राहु' ह्या शिवसेनेच्या ब्रिद वाक्यानुसार रविवार दिनांक 15/02/2026 रोजी ठाणे महापालिका क्षेत्रातील दिवा शहरातील प्रभाग क्रमांक 27 क मधील रहिवासी इमारती तसेच चाळीं मधील रहिवाशांना निवडणुकी पूर्वी दिलेल्या वचनांची पुर्ती करण्यासाठी नगरसेविका दिपाली भगत आणि विभागप्रमुख उमेश अशोक भगत यांनी आपल्या पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांसह रहिवाशांच्या नागरी समस्या अर्थात 'रस्ता, गटर लाईन, पथ दिवे, मुबलक पाणी' अशा अनेक समस्याचा आढावा घेत प्रभागात दौरा केला प्रसंगी रहिवाशांनी नगरसेविका दिपाली भगत आणि विभागप्रमुख उमेश भगत यांचे रहिवास्यांनी शाल, श्रीफळ देऊन स्वागत केले तसेच प्रभाग क्रमांक 27 (क) मधील नागरीकांच्या सर्व नागरी समस्या पावसाळ्या पूर्वीच सोडवू असे आश्वासन दिले यावेळी नागरिक व कार्यकर्ते तसेच पदाधिकारी दिव्यातील बी आर नगर येथे मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते.

# आधुनिक पत्रकारिता विषयावर कार्यशाळा

**नांदेड जिल्हा : (समर्थ गांवकरी)**

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या जनसंपर्क कार्यालय व माध्यमशास्त्र संकुल यांच्या संयुक्त विद्यमाने "आधुनिक पत्रकारिता" या विषयावरील एकदिवसीय विद्यापीठस्तरीय कार्यशाळेचे आयोजन बुधवार, दि. १८ फेब्रुवारी, २०२६ रोजी करण्यात आले आहे, अशी माहिती कार्यशाळेचे समन्वयक व जनसंपर्क अधिकारी डॉ. अशोक कदम यांनी दिली आहे. या कार्यशाळेचे उद्घाटन बुधवार, दि. १८ फेब्रुवारी रोजी सकाळी १०.०० वाजता विद्यापीठाच्या अधिसभा सभागृहात होणार आहे. उद्घाटन समारंभाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. मनोहर चासकर राहणार असून प्र-कुलगुरू डॉ. अशोक महाजन व कुलसचिव डॉ. ज्ञानेश्वर पवार यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे.

# आश्रमशाळेत महाशिवरात्री व एकलव्य जयंतीनिमित्त अन्नदान उपक्रम!



**इगतपुरी : (समर्थ गांवकरी)**

इगतपुरी तालुक्यातील धामणगाव येथे दि. १५ फेब्रुवारी रोजी महाशिवरात्री व एकलव्य जयंतीनिमित्त प्राथमिक व माध्यमिक आश्रम शाळा, धामणगाव येथे विशेष अन्नदान उपक्रम राबविण्यात आला.

या प्रसंगी शिवसेना उपजिल्हाप्रमुख श्री. शंकर दादा गाढवे तसेच सामाजिक कार्यकर्ते चंद्रकांत भाऊ आढार यांच्या पुढाकाराने विद्यार्थ्यांना गरमागरम व पौष्टिक खिचडी तसेच केळीचे वाटप करण्यात आले. सकस आहार मिळाल्याने विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद ओसंडून वाहताना दिसत होता. या कार्यक्रमास अखिल भारतीय आदिवासी विकास परिषदचे गणपतराव गोडे, संदीप रोडे, संदीप सायाळे, पवन कोंडुळे, दर्शन घोडे, लकी बडतर, अनिल बडतड, विठ्ठल ठवळे सर तसेच गावातील इतर सामाजिक कार्यकर्ते उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या शेवटी अन्नदानाबद्दल शाळेचे मुख्याध्यापक व संस्थेचे अध्यक्ष मा. श्री. गंपा माने साहेब तसेच शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी आयोजकांचे आभार मानले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून सामाजिक बांधिलकीचा उत्तम आदर्श या निमित्ताने घालून देण्यात आला.

# "सांसारिक जीवनाचा त्याग करून जैन दीक्षा स्वीकारणे ही मोठी गोष्ट" : मंगलप्रभात लोढा

**पुणे : (समर्थ गांवकरी)**



जैन शासनाच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी नोंदवला जाईल असा अविस्मरणीय क्षण 'संयमरंग उत्सवा' दरम्यान अनुभवायला मिळाला. तब्बल ६४ मुमुक्षूंनी सांसारिक जीवनाचा त्याग करून जैन दीक्षा स्वीकारली. सुमारे २५ हजारांहून अधिक भाविकांच्या उपस्थितीत पार पडलेल्या या भव्य दीक्षा सोहळ्याने संपूर्ण परिसर आध्यात्मिक उर्जेने भारावून गेला. हा महोत्सव शांतिचंद्रसूरी समुदायाचे गच्छाधिपती आचार्य सोमसुंदरसूरीजी, आचार्य योगतिलकसूरीजी, आचार्य कुशलचंद्रसूरीजी आणि आचार्य पुण्यसुंदरसूरीजी यांच्या पावन सान्निध्यात संपन्न झाला. आचार्य भगवंतांच्या आशीर्वादाने दीक्षार्थींनी संयम, त्याग आणि साधनेचे कठोर व्रत स्वीकारले. 'रजोहरण' अर्पण विधीच्या वेळी संपूर्ण मैदान "जैनं जयति शासनम्" या घोषणांनी दुमदुमून गेले. दीक्षा विधीदरम्यान अनेक कुटुंबांसाठी तो अत्यंत भावनिक क्षण ठरला. विशेष आकर्षण ठरले अध्यात्म परिवाराशी संबंधित युवा कार्यकर्ते ऋषभभाई आणि त्यांची धर्मपत्नी सोनलबेन यांचा दृढ संकल्प. दोघांनीही तरुण वयात संसाराचा त्याग करून आजीवन ब्रह्मचर्य स्वीकारत उपस्थितांना प्रेरणेचा संदेश दिला. या प्रसंगी महाराष्ट्र सरकारचे मंत्री मंगल प्रभात लोढा यांनी उपस्थित राहून दीक्षार्थी आणि त्यांच्या कुटुंबीयांच्या भावनांना अभिवादन केले. जैन समाजातील विविध ट्रस्टचे मान्यवर, संस्थांचे प्रतिनिधी आणि हजारो भाविकांनी सोहळ्यास उपस्थिती लावली होती. असाच भव्य दिव्य ६४ संयमींची 'वडी दीक्षा' सोहळा येत्या ७ मार्च रोजी मुंबईतील बोरिवली येथे श्री शांतिचंद्र शताब्दी महोत्सवानिमित्त भव्य उत्सवात पार पडणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली.

# अंगणवाड्याचा गोलमाल अंगणवाडी ताई मात्र मालामाल

**मुखेड : (समर्थ गांवकरी)**

मुखेड तालुक्यातील अंगणवाडीचे फारच विदारक चित्र पहावयास मिळते आहे. तालुक्यात जवळपास चारशेच्यावर एकुण अंगणवाड्या आहेत मात्र जवळपास दोनशे ते अडीचशे अंगणवाड्यांना इमारतच नाही. त्यातीलच एक सुगाव (बु.) या ठिकाणी गेली बऱ्याच वर्षापासून अंगणवाडी रस्त्यावरच भरवली जाते. याकडे कोणाचेही लक्ष दिसत नसल्याचं समजते. तर सध्या तालुक्यात काही ठिकाणी शाळांच्या इमारती मध्ये अंगणवाडी भरवली जाते. बऱ्याच गावातील नागरिकाचे मत असे आहे की याकडे शासन दुर्लक्ष का करतोय हे दुःखाची बाब आहे. आमच्या मुलांना रस्त्यावर बसवल्यामुळे येणाऱ्या जाणाऱ्या वाहनांना कसरत करावी लागत आहे. तसेच सुगाव बु. येथील जिल्हा परिषद शाळा नॅशनल हायवे क्रमांक १६१ या रस्त्याच्या बाजूला असल्यामुळे मुलांना ये जा करण्यासाठी जीव धोक्यात ठेवून शाळेला जावं लागत आहे. एखाद्या विद्यार्थ्याचं अनवधानाने नुकसान झालं तर याला जबाबदार कोण असे गंभीर मत पालक उपस्थित करत आहे. याप्रकरणी अनेक पालकांनी तक्रार दर्शवली परंतु याची दखल कुठल्याही सरपंचांनी किंवा लोकप्रतिनिधी ने घेतलेली नाही असा दावा देखील करत आहेत.

**नावात बदल**

सौ. शोभा ज्ञानेश्वर घुंडरे व थिटे शोभाबाई दत्तात्रय – Thite Shobhabai Dattatraya (शाळा सोडल्याचे दाखल्यावरील नाव) रा. आळंदी देवाची ही दोन्ही नावे सौ. शोभा ज्ञानेश्वर घुंडरे यांचीच असून या नावाची एकच व्यक्ती असून एकाच व्यक्तीची नावे आहे. त्यासाठी सदरची जाहिरात प्रसिध्द करण्यात येत आहे.

# निमगाव खलू सिमेंट प्रकल्पाच्या चौकशीचे आदेश

## खासदार नीलेश लंके यांच्या पर्यावरणीय आक्षेपांवर सखोल अहवाल मागवला

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**



श्रीगोंदा तालुक्यातील निमगाव खलू येथे प्रस्तावित ६.० एमटीपीए क्षमतेच्या सिमेंट ग्राइंडिंग प्रकल्पावरून वाद अधिकच तापला असून आता प्रकरण थेट केंद्र-राज्य प्रशासनाच्या उच्च पातळीवर पोहोचले आहे. स्थानिक नागरिक व शेतकऱ्यांनी केलेल्या आक्षेपांनंतर खासदार नीलेश लंके यांनी उपस्थित केलेल्या मुद्द्यांची गंभीर दखल घेत अधिकृत चौकशी प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.

केंद्रीय पर्यावरण मंत्री भूपेन्द्र यादव यांनी मंत्रालयीन स्तरावर आढावा घेतल्यानंतर प्रकरण राज्य यंत्रणांकडे तपासासाठी पाठवले. संबंधित प्रकल्प 'कॅटेगरी-बी' मध्ये येत असल्याने पर्यावरण मंजुरी राज्य स्तरावर होत असली, तरी पर्यावरणीय, सामाजिक आणि आरोग्यविषयक मुद्द्यांचा सखोल विचार करूनच पुढील निर्णय घ्यावा, असे स्पष्ट निर्देश देण्यात आले आहेत. केंद्रीय स्तरावर उद्योग विभागामार्फत राज्य शासनाला पत्र पाठवून उपस्थित मुद्द्यांवर तपास करून 'ॲक्शन टेकन रिपोर्ट' सादर करण्यास सांगण्यात आले. त्यानंतर प्रकरण पुढे जात राज्यस्तरावर महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ आणि एस इ आय ए ए महाराष्ट्र यांना तपासाचे आदेश देण्यात आले.

फेब्रुवारी २०२६ मध्ये राज्य पर्यावरण विभागाने जिल्हाधिकारी अहिल्यानगर तसेच प्रदूषण नियंत्रण मंडळाला सखोल चौकशी करून तातडीने अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले. ही कारवाई २ डिसेंबर २०२५ रोजी नीलेश लंके यांनी उपस्थित केलेल्या तक्रारीतील मुद्द्यांच्या आधारे करण्यात आल्याचे अधिकृत पत्रात नमूद आहे. या प्रकल्पाविरोधात सुमारे पाच हजारांहून अधिक आक्षेप नोंदवले गेले आहेत. नागरिकांनी ईआयए अहवालातील त्रुटी, लोकसुनावणीतील पारदर्शकतेचा अभाव, हवा-पाणी प्रदूषणाचा धोका, शेती-पशुपालनावर परिणाम आणि आरोग्यविषयक दुष्परिणाम यांसह जमीन नोंदी व आपत्ती व्यवस्थापन आराखड्यातील त्रुटींचे मुद्दे मांडले आहेत.

या सर्व घडामोडींमुळे निमगाव खलू प्रकल्प आता केवळ स्थानिक न राहता प्रशासकीय आणि धोरणात्मक पातळीवरील विषय ठरला आहे. केंद्राचे निर्देश, राज्याची चौकशी आणि पर्यावरण मंजुरी प्रक्रियेत होणारा निर्णय या प्रकरणात निर्णायक ठरणार असून ग्रामस्थांचे लक्ष आगामी अहवालाकडे लागले आहे.

**ग्रामपंचायत कार्यालय सितेवाडी, ता.जुन्नर, जि. पुणे**

**जाहीर निविदा सुचना क्र. सन २०२५-२६**

ग्रामपंचायत सितेवाडी, ता.जुन्नर, जि. पुणे यांचे तर्फे ग्रामविकास विभाग महाराष्ट्र शासन / जिल्हा परिषद यांचेकडील पंजीकरण / नोंदणीकृत केलेल्या योग्य त्या वर्गातील पात्र नोंदणीकृत कंत्राटदार यांजकडून दोन लिफाफा पध्दतीने खालील कामाच्या निविदा मागविण्यात येत आहेत. ग्रामपंचायत सितेवाडी, ता.जुन्नर, जि. पुणे यांचे वतीने खालील कामांच्या बी-१ निविदा दोन लिफाफा पद्धतीने योग्य त्या नोंदणीकृत मक्तेदारांकडून मागविणेत येत आहे. कामांबाबत निविदा अटी व शर्ती इ. बाबतचा सर्व तपशील निविदा संचामध्ये नमुद केला असून कोरा निविदा संच दि.१७/०२/२०२६ ते २४/०२/२०२६ पर्यंत सकाळी १० ते ५ या वेळेत ग्रामपंचायत कार्यालयात रोखीने अथवा धनाकर्ष भरणा करून उपलब्ध आहे. परीपूर्ण भरलेल्या निविदा वरील कालावधीतच सादर करणे बंधनकारक आहे. निविदा शक्य झाल्यास २५/०२/२०२६ च्या मासिक सभेत उघडण्यात येतील. निविदा अटी व शर्तीमध्ये बदल करणे अथवा प्राप्त निविदांपैकी कोणतीही निविदा स्वीकारणे अथवा नाकारणेचा अधिकार ग्रामपंचायतने राखून ठेवला आहे.

| अ.क्र | कामाचे नाव | अंदाजीत रक्कम | निविदा फी | इसारा रक्कम | काम पुर्णचा कालावधी | ठेकेदाराचा वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | घनकचरा सांडपाणी व्यवस्थापन | ५४१२७४/- | ५००/- | ५००/- | ६ महिने | खुला |

टिप – वरील कामाबाबत नियम, शर्ती, अटी व इतर सर्व सविस्तर माहिती ग्रामपंचायत कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर पहावयास मिळेल.

ग्रामपंचायत अधिकारी सरपंच
ग्रामपंचायत सितेवाडी, ता.जुन्नर, जि.पुणे

# महादेव जरे यांचा सेवापूर्ती कृतज्ञता गौरव समारंभ संपन्न

**श्रीगोंदा : (समर्थ गांवकरी)**




रयत शिक्षण संस्थेच्या महाराजा जिवाजीराव शिंदे महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. डॉ. महादेव जरे यांच्या सेवापूर्ती निमित्त कृतज्ञता गौरव समारंभ मोठ्या उत्साहात व दिमाखात संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी मंत्री बबनराव पाचपुते होते.

यावेळी बोलताना बबनराव पाचपुते म्हणाले की, प्राचार्य डॉ. जरे यांनी आपल्या कार्यकाळात महाविद्यालयाच्या सर्वांगीण विकासात मोलाची भर घातली. उर्वरित आयुष्यात त्यांनी पर्यटन व लेखनास वेळ द्यावा, अशा शुभेच्छा त्यांनी दिल्या.

आष्टी-पाटोदा-शिरूर विधानसभा मतदारसंघाचे आमदार सुरेश अण्णा धस यांची विशेष उपस्थिती लाभली. ते म्हणाले की, डॉ. जरे यांचे व्यक्तिमत्त्व सामाजिक बांधिलकी जपणारे आहे. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतून त्यांनी शिक्षणाच्या बळावर प्राचार्यपदापर्यंतचा प्रवास केला. ऊसतोड कामगाराचा मुलगा प्राचार्य होतो, ही अभिमानाची बाब असल्याचे त्यांनी नमूद केले.

जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष बाबासाहेब भोसले यांनी सांगितले की, सेवापूर्ती समारंभ मातोश्रींच्या उपस्थितीत होत असल्याने डॉ. जरे भाग्यवान आहेत. प्राचार्य म्हणून त्यांनी उल्लेखनीय कार्य केले असून त्यांच्या भावी जीवनासाठी शुभेच्छा व्यक्त केल्या.

कर्मवीर भाऊराव पाटील विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. ज्ञानदेव म्हस्के यांनी डॉ. जरे हे इंग्रजी विषयाचे प्राध्यापक असल्याचा उल्लेख करत, इंग्रजी ही ज्ञानभाषा असून त्यांनी ज्ञानाच्या कक्षा अधिक विस्ताराव्यात, असे आवाहन केले.

प्राचार्य डॉ. नानासाहेब गायकवाड, मा. राजेंद्र फाळके, रयत शिक्षण संस्थेचे माध्यमिक विभागाचे सहसचिव प्राचार्य बंडू पवार, नगराध्यक्ष सौ. सुनिताताई खेतमाळीस आदी मान्यवरांनीही डॉ. जरे यांना भावी आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

याप्रसंगी सत्कारमूर्ती प्राचार्य डॉ. महादेव जरे व सौ. लता जरे यांचा सन्मान करण्यात आला. मनोगत व्यक्त करताना डॉ. जरे यांनी महाविद्यालयाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. "मी या महाविद्यालयाचा माजी विद्यार्थी आहे. महाविद्यालय विकास समितीचे सदस्य व तत्कालीन प्राचार्य वामन यांच्या मार्गदर्शनामुळेच माझी जडणघडण झाली. ऊसतोड कामगाराचा मुलगा असल्याने आयुष्यात अनेक प्रतिकूल परिस्थितींचा सामना करावा लागला; मात्र संघर्षातूनच माझा प्रवास घडला," असे ते म्हणाले.

या समारंभास रयत शिक्षण संस्थेचे उत्तर विभागीय अधिकारी नवनाथ बोडखे, महावीर पटवा, प्राचार्य डॉ. के. एच. शिंदे, प्राचार्य तुकाराम कन्हेरकर, प्राचार्य डॉ. संजय नगरकर, प्राचार्य डॉ. एकनाथ खांदवे, प्राचार्य डॉ. सतीशचंद्र सूर्यवंशी, प्राचार्य डॉ. अशोक धुमाळ, प्राचार्य दिलीप भुजबळ, प्राचार्य शहाजी मखरे, उपनगराध्यक्ष अलकाताई अनभुले, संग्राम घोडके, दिलीप तुपे, पत्रकार बाळासाहेब काकडे, पत्रकार पिटर रणसिंग, पत्रकार चंदन घोडके तसेच मित्रपरिवार, आप्तेष्ट, गावातील नागरिक, सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.




ठाणे : दिवा शहरातील साबेगाव, डी जे कॉम्प्लेक्स येथील ओंकारेश्वर महादेव मंदिरात महाशिवरात्री निमित्त दर्शनासाठी शिवभक्तांचा उत्साह शिगेला पोहचला होता. प्रसंगी पहाटे पासून मंदिरात दर्शनासाठी शिवभक्तांच्या रांगा दिसून आल्या तर मंदिर समितीच्या सौ. अर्चना निलेश पाटील ( नगरसेविका) व विभागप्रमुख निलेश बाळाराम पाटील यांनी भक्तांसाठी प्रसादासह सर्व सोय उपलब्ध करून दिली होती तर उपस्थित अनेक मान्यवरांचे स्वागत व सत्कार करण्यात आला. ( फोटो - संतोष पडवळ )

# अर्धापुरात जयंतीनिमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन

- **दि.२३ फेब्रुवारीला समाज परिवर्तनकार प्रा.डॉ.वसंत हंकारे सर यांचे व्याख्यान होणार**

**अर्धापूर : (समर्थ गांवकरी)**



गेल्या अनेक वर्षांपासून शहरात सार्वजनिक शिवजन्मोत्सव सोहळा उत्साहात साजरा करण्यात येतो. यावर्षीही विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. अन्नदान, महारक्तदान, महाआरोग्य शिबिरासह दि.२३ फेब्रुवारी रोजी सायंकाळी सात वाजता प्रसिद्ध समाज परिवर्तनकार प्रा. डॉ.वसंत हंकारे यांचे शहरातील कै. सखारामजी लंगडे नगर मधील महात्मा बसवेश्वर माध्यमिक विद्यालयाच्या मैदानावर व्याख्यान होणार आहे. नुकतीच अर्धापूर तालुका शिवजन्मोत्सव समितीच्या वतीने बैठक घेऊन विविध समाजपयोगी कार्यक्रम करण्याचे ठरले. यात दि.१५ फेब्रुवारी रोजी ५ ते ७ वी व ८ व १० वी च्या विद्यार्थ्यांसाठी ज्ञानसाधना सायन्स व कॉमर्स अकॅडमी च्या मैदानावर सामान्य ज्ञान परीक्षेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी मोठ्या संख्येने विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. तसेच १९ फेब्रुवारी रोजी शहरातील तामसा कॉर्नर येथील महात्मा बसवेश्वर चौकात सकाळी दहा ते दुपारी एक वाजेपर्यंत छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन व अभिवादन करून आरोग्य तपासणी, डोळे तपासणी सह आरोग्य शिबीर संपन्न होणार आहे. तसेच महारक्तदान शिबीर घेण्यात येणार आहे.

यावर्षीच्या शिवजन्मोत्सव सोहळ्याचे मुख्य आकर्षण म्हणजे प्रसिध्द समाजपरिवर्तनकार प्रा. डॉ.वसंत हंकारे सर यांचे व्याख्यान असणार आहे. दि. २३ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ठीक सात वाजता कै. सखारामजी लंगडे नगर येथील महात्मा बसवेश्वर माध्यमिक विद्यालयाच्या मैदानावर त्यांच्या व्याख्यानाचा कार्यक्रम व सामान्य ज्ञान परीक्षेत उत्तीर्ण विद्यार्थ्यांना बक्षीस वितरण होणार आहे. तरी मोठ्या संख्येने खास करून विद्यार्थी व पालकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन संयोजन समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

# 'महाशिवरात्री व दीपोत्सवा'चे भव्य आयोजन

**मुदखेड : (समर्थ गांवकरी)**

येथील श्री अपरंपार स्वामी मठ संस्थान व समस्त गावकऱ्यांच्या वतीने दरवर्षीप्रमाणे यंदाही महाशिवरात्री व दीपोत्सव २०२६ चे अत्यंत मंगलमय वातावरणात आयोजन करण्यात आले आहे. दि. १५ फेब्रुवारी ते १९ फेब्रुवारी या कालावधीत शहरात विविध धार्मिक कार्यक्रमांची रेलचेल असणार असून, संपूर्ण मुदखेड शहर दीपमाळांनी उजळून निघणार आहे. श्री अपरंपार मठाचे सेवेधारी ईश्वर महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली खालीलप्रमाणे कार्यक्रम पार पडणार असुन यात दीपोत्सव शुभारंभ रविवार, दि. १५ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ६:३० वाजता प.पु. तपस्वी गोवत्स बालयोगी व्यंकटस्वामी महाराज (पिंपळगाव) यांच्या शुभहस्ते दीप प्रज्वलन व भव्य दीपोत्सव साजरा होणार.

# तरुणांनी वृद्ध आई-वडिलांच्या कष्टाची जाणीव ठेवावी : नेहा ताई साळेकर महाराज

**श्रीगोंदा तालुका : (समर्थ गांवकरी)**



तरुणांनी वृद्ध आई-वडिलांच्या कष्टांची जाणीव ठेवून त्यांच्या वृद्धापकाळात आधार देणे हीच खऱ्या अर्थाने भगवंताची सेवा असल्याचे भावनिक प्रतिपादन समाजप्रबोधनकार नेहा ताई साळेकर महाराज यांनी केले.

श्रीगोंदा येथील सामाजिक कार्यकर्ते दिवंगत आप्पासाहेब दळवी यांच्या प्रथम पुण्यस्मरणानिमित्त आयोजित कीर्तनरूपी सेवेत त्या बोलत होत्या.

नेहा ताई साळेकर म्हणाल्या की, मृत्यूसमोर धनसंपत्ती, गाडी, बंगला, पद, प्रतिष्ठा किंवा अधिकार यांना काहीही महत्त्व नसते. त्यामुळे जीवन जगताना आपले कर्तव्य काय, याची जाणीव ठेवणे आवश्यक आहे. सुख-दुःख हे कर्माचे फळ असून, कर्माची गती निश्चित असते. कितीही धनवान असलो तरी मृत्यूला कोणीही वश करू शकत नाही, असे त्यांनी स्पष्ट केले.

सध्याच्या परिस्थितीत काहीजण शंभर वर्षे आयुष्य जगूनही मुखाने रामकृष्णाचे नामस्मरण करू शकत नाहीत, याबद्दल खंत व्यक्त करत त्यांनी धार्मिक कार्यांवर टीका करणाऱ्यांनाही सुनावले. पुण्यस्मरणासारख्या धार्मिक कार्यक्रमांबाबत टीका केली जाते; मात्र असे कार्यक्रम टाळल्यास कुटुंबावर पितृदोषाचा परिणाम होतो, असे त्यांनी सांगितले. पूर्वजांचे स्मरण आणि पुण्यस्मरण ही कर्तव्याची बाब असून स्पर्धेच्या युगात त्यांना विसरता कामा नये, असे त्यांनी आवाहन केले.

भगवान श्रीकृष्णांच्या विचारांनी जीवनमार्ग ठरवण्याची गरज त्यांनी अधोरेखित केली. जीवनात कोणताही दुःखद प्रसंग आला तरी पांडुरंगाचे चिंतन आणि नामस्मरण यालाच प्राधान्य द्यावे. हृदयात हरीचे स्थान असेल तर भगवंतप्राप्ती निश्चित आहे. शाश्वत सुखासाठी सतत नामस्मरण आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले. तसेच गोमातेची सेवा केल्यास तेथे ३३ कोटी देवतांचे पूजन होते, असेही त्यांनी सांगितले.

तुकाराम महाराजांच्या "साठविला हरी जीहीं हृदयी मंदिरी, त्यांची सरली येरझारा झाला सफल व्यापार" या अभंगाच्या सादरीकरणाने त्यांनी उपस्थित भाविकांना मंत्रमुग्ध केले.

या कीर्तनरूपी सोहळ्यास युवा नेते दिग्विजय नागवडे, खरेदी-विक्री संघाचे माजी अध्यक्ष दीपक पाटील भोसले, माजी उपसभापती बाळासाहेब नलगे, नगराध्यक्ष सुनिता खेतमाळीस, उपनगराध्यक्ष अलकाताई अनुभवले, सागर गोरे, अरविंद कापसे, नागवडे कारखान्याचे संचालक प्रशांत दरेकर, भाऊसाहेब नेटके, प्राचार्य सतीशचंद्र सूर्यवंशी, शिवसेनेचे नेते नंदकुमार ताडे यांसह शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. आभार प्रदर्शन संजय दळवी यांनी केले.

# अगस्ति महाविद्यालयात 'पर्सनॅलिटी दॅट ओपनस द डोअर' विषयावर व्याख्यान

## लंडन सक्सेस अकॅडमीचे संस्थापक निलेश वाघचौरे यांनी साधला विद्यार्थ्यांशी संवाद

**अकोले : (समर्थ गांवकरी)**




अकोले येथील अगस्ति कला वाणिज्य व दादासाहेब रूपवते विज्ञान महाविद्यालय अकोले तसेच ग्लोबल नगरी फाउंडेशन यूएसए अंतर्गत मेन्टर मित्रा प्रोजेक्ट यांचे संयुक्त विद्यमाने दि. 14 फेब्रुवारी ते 18 एप्रिल 2026 या कालावधीत 'सॉफ्ट स्किल अँड लाइफ स्किल डेव्हलपमेंट कोर्स'चे आयोजन करण्यात आले आहे.

या कोर्स अंतर्गत ग्लोबल नगरी फाउंडेशनचे विविध तज्ञ विद्यार्थ्यांना करिअरच्या दृष्टीने मार्गदर्शन करणार आहेत. याचाच एक भाग म्हणून शनिवारी (दि.14) 'पर्सनॅलिटी दॅट ओपनस द डोअर' या विषयावर लंडन सक्सेस अकॅडमीचे संस्थापक निलेश वाघचौरे यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले. प्रसंगी त्यांनी विद्यार्थ्यांना महत्त्वपूर्ण मार्गदर्शन केले. जीएनएफ सदस्य व समन्वयक काशिनाथ तिटमे, विजय काळे, दीपाश्री मुळे, प्रमोद कारले, प्राची बोरुडे तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.भास्कर शेळके आदी मान्यवर उपस्थित होते.

प्रारंभी प्रोफेसर डॉ. विजय भगत यांनी स्वागत करून जीएनएफ मध्ये विद्यार्थ्यांची निवड कशा पद्धतीने केली जाते हे सांगितले. प्रास्ताविक ग्लोबल नगरी फाउंडेशनचे उपाध्यक्ष रोहित काळे यांनी केले तर पाहुण्यांचा परिचय जीएनएफ समन्वयक प्रा. वर्षा नवले यांनी करून दिला. व्याख्याते निलेश वाघचौरे यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधताना विविध विषयांवर त्यांची मते जाणून घेतली. आपण स्वतः आपली प्रगती कशा पद्धतीने करू शकतो आणि यासाठी आपणच कसे जबाबदार आहोत हे समजावून सांगितले. काही लोक खूप श्रीमंत आहेत आणि काही लोक खूप गरीब, जगातील ही दरी का? याबाबतचे महत्वपूर्ण विश्लेषण त्यांनी केले.

तसेच जगात उपलब्ध असणाऱ्या अमर्याद संधींचा उपयोग विद्यार्थी कशा पद्धतीने करून घेऊ शकतो याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. मोठी स्वप्ने पाहा, नवनवीन तंत्र अभ्यासा आणि चाकोरीबाहेर विचार करा असे आवाहन विद्यार्थ्यांना केले. प्राचार्य डॉ. भास्कर शेळके यांनी आभार मानले. कार्यक्रम समन्वयक प्रा. कोमल राठी यांचेसह सर्व प्राध्यापक व विद्यार्थी उपस्थित होते.

# भूगोल अभ्यास सहल संपन्न

**मुदखेड : (समर्थ गांवकरी)**

मुदखेड येथील राजीव गांधी महाविद्यालय, मुदखेड च्या भूगोल विभागाच्या वतीने आयोजित एकदिवसीय अभ्यास सहल उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाली. प्राचार्य डॉ. ए. टी. शिंदे व भूगोल विभागप्रमुख प्रा. डॉ. राजेश्वर कोटलवार यांच्या मार्गदर्शनाखाली ही सहल यशस्वीरीत्या पार पडली. या सहलीदरम्यान विद्यार्थ्यांनी नांदेड जिल्ह्यातील साडेतीन शक्तीपीठांपैकी एक असलेल्या माहूर गड येथे भेट देऊन धार्मिक, ऐतिहासिक व भौगोलिक वैशिष्ट्यांचा अभ्यास केला. तसेच महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध नैसर्गिक पर्यटन स्थळ सहस्त्रकुंड धबधबा येथे भूपृष्ठ रचना, जलप्रवाहाची दिशा, खडकांची संरचना आणि परिसरातील नैसर्गिक संपत्तीचे प्रत्यक्ष निरीक्षण करण्यात आले.

# APL शेतकरी लाभार्थ्यांना राशनऐवजी रोख रक्कम मिळाली नाही; तहसीलदारांना निवेदन

**किनवट : (समर्थ गांवकरी)**




महाराष्ट्र शासनाने राशनधारक शेतकऱ्यांना धान्याऐवजी थेट त्यांच्या बँक खात्यात रोख रक्कम जमा करण्याची योजना सुरू केली असली, तरी किनवट तालुक्यातील अनेक APL शेतकरी लाभार्थ्यांना गेल्या सुमारे एक वर्षापासून या योजनेअंतर्गत रक्कम मिळालेली नसल्याचा आरोप करण्यात आला आहे. या संदर्भात किनवट तालुका भारतीय जनता पक्षाचे आदिवासी मोर्चा अध्यक्ष संतोष पांडुरंग कनाके यांनी तहसीलदार, तहसील कार्यालय, किनवट यांना लेखी निवेदन सादर केले आहे. यावेळी ज्येष्ठ कार्यकर्ते गोविंद सिरमनवार यांची उपस्थिती होती. निवेदनात म्हटले आहे की, शासनाने राशनऐवजी थेट बँक खात्यात रक्कम जमा करण्याची योजना सुरू करूनही अनेक APL राशनकार्डधारक शेतकरी लाभार्थ्यांच्या खात्यात धान्याच्या मोबदल्याची रक्कम जमा झालेली नाही. परिणामी संबंधित लाभार्थ्यांना आर्थिक अडचणींना सामोरे जावे लागत असून शासनाच्या योजनेचा प्रत्यक्ष लाभ त्यांच्यापर्यंत पोहोचत नसल्याची भावना व्यक्त करण्यात आली आहे. याबाबत तहसील प्रशासनाने तात्काळ दखल घेऊन प्रलंबित रक्कम तपासावी आणि गेल्या एक वर्षाची थकित रक्कम संबंधित लाभार्थ्यांच्या बँक खात्यात त्वरीत जमा करावी, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. या निवेदनाची प्रत जिल्हाधिकारी, नांदेड तसेच मा. सहाय्यक जिल्हाधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, किनवट यांनाही देण्यात आली आहे. प्रशासनाने या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेऊन योग्य ती कार्यवाही करावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

# स्वारातीम विद्यापीठात संत सेवालाल महाराज जयंती साजरी



**नांदेड जिल्हा : (समर्थ गांवकरी)**

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या प्रशासकीय इमारतीतील स्वागत कक्षामध्ये आज रविवार, दि.१५ फेब्रुवारी, २०२६ रोजी संत सेवालाल महाराज यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. या प्रसंगी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. मनोहर चासकर यांच्या हस्ते संत सेवालाल महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी प्र-कुलगरू डॉ. अशोक महाजन, नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळाचे संचालक डॉ.शैलेश वाढेर, जनसंपर्क अधिकारी डॉ. अशोक कदम, गोविंद हंबर्डे, शिवाजी हुंडे, शैलेश कांबळे व बबन हिंगे यांची प्रमुख उपस्थिती होती. याप्रसंगी विद्यापीठातील प्राध्यापक, अधिकारी, कर्मचारी व विद्यार्थ्यांनी संत सेवालाल महाराज यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून अभिवादन केले.

# पालिकेची सुत्रे करणदादा ससाणेंच्या हाती !

## मंदावलेल्या विकासकामांना मिळाली गती : आपला स्वच्छ, सुंदर श्रीरामपूर शहर : राज्यात विकासकामांत मोठा चंगा !

**शौकतभाई शेख / श्रीरामपूर : (समर्थ गांवकरी)**

- **करण ससाणे नगराध्यक्षपदी विराजमान होताच वाहू लागली विकासाची गंगा !!**



"सेवा आमचा धर्म, विकास आमचे कर्म" या ब्रीदवाक्याखाली निवडणूक लढवणारे करण ससाणे यांना श्रीरामपूरच्या सुज्ञ मतदारांनी नगराध्यक्षपदी मोठ्या मताधिक्याने विजयी केले. श्रीरामपूर नगरपालिकेच्या ३२ नगरसेवकांपैकी तब्बल २० नगरसेवक काँग्रेस व आघाडी मित्रपक्षांचे निवडून आल्याने एकहाती सत्ता स्थापन करण्यास भक्कम आधार मिळाला,याकामी कॉंग्रेस आणी आघाडी मित्रपक्षाचे निष्ठावंत कार्यकर्ते,पदाधिकारी यांचे विशेष परिश्रम मोठ्या मोलाचे ठरले आहे. गत साडेचार वर्षांपासून श्रीरामपूर नगरपालिकेत प्रशासक राज असल्याने शहरातील अनेक विकासकामे रखडली होती. नागरिकांना दैनंदिन जीवनात विविध समस्यांना सामोरे जावे लागत होते. घनकचरा व्यवस्थापनाचा प्रश्न,स्वच्छ पाणीपुरवठ्यात अडचणी,अनेक ठिकाणी बंद स्ट्रीट लाईट या सर्व प्रश्नांमुळे नागरिक त्रस्त झाले होते. मात्र करणदादा ससाणे नगराध्यक्षपदी विराजमान होताच विकासकामांना वेग मिळू लागला आहे. श्रीरामपूर नगरपालिकेची सूत्रे हाती घेताच करणदादांनी सर्वप्रथम रस्ते दुरुस्तीचे काम हाती घेतले. खड्डेमय रस्त्यांची तातडीने दुरुस्ती, डांबरीकरण आणि मुख्य मार्गांचे मजबुतीकरण सुरू करण्यात आले. तसेच घनकचरा व्यवस्थापनाकडे कटाक्षाने लक्ष, नियमित कचरा संकलन मोहिम, पाणीपुरवठा सुरळीत करण्यासाठी जलवाहिन्यांची दुरुस्ती, शहरातील काही ठिकाणच्या बंद स्ट्रीट लाईट तात्काळ कार्यान्वित या निर्णयांमुळे शहरात सकारात्मक बदल दिसू लागले आहेत. करणदादा ससाणे यांचे वडील, तालुक्याचे माजी आमदार व माजी नगराध्यक्ष जयंतराव ससाणे यांच्या कार्यकाळात श्रीरामपूरमध्ये विकासकामांचा सुवर्णकाळ अनुभवला गेला होता. त्याच कर्तबगार आणि दूरदर्शी नेतृत्वाची झलक आज करणदादा ससाणे यांच्या कार्यातून पुन्हा पाहायला मिळत असल्याची चर्चा शहरातील जनसामान्यांतून होत आहे.नागरिकांचे म्हणणे आहे की

"करणदादा निर्णयक्षम आहेत, कामात गती आहे आणि प्रशासनावर त्यांची मजबूत पकड आहे. नगराध्यक्ष पदाची जबाबदारी स्वीकारल्यानंतर करणदादांनी शहरातील विविध भागांना भेटी देऊन प्रत्यक्ष पाहणी केली. नागरिकांच्या तक्रारी ऐकून तत्काळ संबंधित अधिकाऱ्यांना निर्देश देण्यात आले.

शहर विकासाच्या दृष्टीने पुढील योजना आखण्यात येत आहेत- शहर सुशोभीकरण,स्वच्छता अभियानाला चालना सार्वजनिक आरोग्य सुविधा सुधारणा तथा विकासाचा वेग कायम राहणार असल्याने श्रीरामपूर शहराला पुन्हा विकासाच्या मार्गावर आणण्याचा निर्धार करण ससाणे यांनी व्यक्त केला आहे. "शहराचा सर्वांगीण विकास हाच आमचा ध्यास आहे," असेही त्यांनी स्पष्ट केले.

आज श्रीरामपूर शहरामध्ये पुन्हा एकदा विकासाची गंगा वाहताना दिसत आहे. प्रशासकीय स्थैर्य, ठोस निर्णयक्षमता आणि लोकसहभाग यांच्या बळावर शहर नव्या उंचीवर झेपावेल, असा विश्वास नागरिक व्यक्त करत आहेत.

आमदार हेमंत (तात्या) ओगले,माजी नगराध्यक्षा राजश्रीताई ससाणे समवेत कॉंग्रेस व आघाडी मित्र पक्षातील नवे - जुने जाणकार आणी संवगडी तथा कॉंग्रेस पक्षातील ज्येष्ठ मार्गदर्शक नगरसेवकांचे मार्गदर्शन मोठ्या मोलाचे ठरत असल्याचेही दिसून येत आहे.

# इंदिरा आयव्हीएफने फर्टिलिटी क्लिनिकचे केले उद्घाटन

पुणे : (समर्थ गांवकरी)



इंदिरा आयव्हीएफ हॉस्पिटल लिमिटेडने ४१ सिटी हब, दुसरा मजला, श्री स्वामी समर्थ नगर, गाडीतळ, हडपसर, पुणे येथे आपल्या नवीन फर्टिलिटी क्लिनिकचे उद्घाटन पुणे महानगर पालिकाच्या अतिरिक्त आयुक्त श्रीमती पवनीत कौर यांच्या हस्ते करणात आले त्यावेळी नगरसेवक योगेश मुळीक, इंदिरा आयव्हीएफचे झोनल बिझनेस डायरेक्टर डॉ. अमोल लुंकड, डॉ. इशिता लुंकड, हडपसर सेंटर हेड डॉ. ईशा कपूर सह अन्य मान्यवर ही उपस्थित होते. या नव्या केंद्राच्या सुरूवातीमुळे पुणे आणि परिसरातील नागरिकांना अधिक सुव्यवस्थित, सुरक्षित आणि सुलभ प्रजनन उपचार सुविधा उपलब्ध होणार आहेत. फर्टिलिटी आणि असिस्टेड रिप्रोडक्टिव्ह सर्व्हिसेसच्या सर्व अत्याधुनिक सुविधांनी सुसज्ज हे केंद्र रुग्णांना स्टॅण्डर्ड क्लिनिकल प्रोटोकॉल, पेशंट सेफ्टी सिस्टीम आणि तंत्रज्ञानाधारित उपचार पद्धतींच्या माध्यमातून पारदर्शक, सुरक्षित आणि स्थिर उपचार सेवा उपलब्ध करून देईल. मुख्य अतिथी पुणे महानगर पालिकाच्या अतिरिक्त आयुक्त श्रीमती पवनीत कौर म्हणाल्या की ,स्थानिक स्तरावर हेल्थकेअर इन्फ्रास्ट्रक्चर बळकट करणे हा प्रदेशाच्या दीर्घकालीन आरोग्य गरजांचा विचार करता अत्यंत महत्त्वाचा भाग आहे. हडपसरमधील इंदिरा आयव्हीएफची सुरुवात कुटुंबांना संघटित फर्टिलिटी केअर अधिक जवळ आणणारी आहे आणि रिप्रोडक्टिव्ह हेल्थमध्ये योग्य वेळी मिळणाऱ्या सल्ला-सेवेच्या महत्त्वावर प्रकाश टाकते विशेष अतिथी नगरसेवक योगेश मुळीक म्हणाले,स्थानिक स्तरावर आरोग्य सेवांची उपलब्धता हा मजबूत समाज व सक्षम कुटुंबांचा पाया आहे. इंदिरा आयव्हीएफचे नवीन केंद्र फर्टिलिटी अवेअरनेस वाढवण्यासोबतच वेळेवर वैद्यकीय सल्ला घेण्यास योग्य प्रोत्साहन देईल. अशा उपक्रमांमुळे संपूर्ण आरोग्यव्यवस्थेवर सकारात्मक परिणाम होतो. इंदिरा आयव्हीएफ हॉस्पिटल लिमिटेडचे मॅनेजिंग डायरेक्टर नितीज मुर्डिया म्हणाले, हडपसरमधील हा विस्तार फर्टिलिटी केअर अधिक सुलभ आणि विश्वासार्ह करण्याच्या आमच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांचा एक भाग आहे. जागरूकता वाढत आहे आणि रुग्ण लवकरच्या टप्प्यातच संगठित मार्गदर्शन शोधत आहेत; अशावेळी अनुभवी वैद्यकीय टीमच्या साहाय्याने एव्हिडन्स-बेस्ड उपचार देणे अत्यंत आवश्यक ठरते. इंदिरा आयव्हीएफ हडपसर सेंटर हेड डॉ. ईशा कपूर म्हणाल्या, आमचे ध्येय असे उपचार वातावरण निर्माण करणे आहे, जिथे वैद्यकीय उपचारासोबतच भावनिक आधारही मिळेल. फर्टिलिटी केअर हा केवळ विज्ञानाचा विषय नाही; यात आत्मीयता आणि सहानुभूती यांचीही तितकीच गरज असते. आमची टीम दोन्ही दृष्टीकोन समोर ठेवून कार्य करेल.

# युएईमार्फत जागतिक विस्तारासाठी फिक्कीच्या पुण्यात B2B बैठका

पुणे : (समर्थ गांवकरी)



भारतीय उद्योगांना युएईमार्फत जागतिक बाजारपेठांमध्ये प्रवेश सुलभ करण्यासाठी फेडरेशन ऑफ इंडियन चेंबर्स ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्री (फिक्की) यांनी पुण्यात बी२बी बैठकींची मालिका आयोजित केली. महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री अँड ॲग्रिकल्चर (मॅकसिया) आणि शारजाह एअरपोर्ट इंटरनॅशनल फ्री झोन (सैफ झोन), युएई सरकार यांच्या सहकार्याने हा उपक्रम राबविण्यात आला.

या बैठकींमध्ये मध्य पूर्व, आफ्रिका, मध्य आशिया आणि रशिया येथील व्यापार व गुंतवणूक संधींवर सविस्तर चर्चा करण्यात आली. तसेच भारत-युएई व्यापक आर्थिक भागीदारी करार (CEPA)चा वापर करून निर्यात आणि सीमापार व्यवसाय कसा वाढवता येईल, याबाबत उद्योगांना मार्गदर्शन करण्यात आले.

उद्योग प्रतिनिधींना युएईमध्ये व्यवसाय स्थापन करण्याचे फायदे समजून घेण्यासाठी सैफ झोनसारख्या गुंतवणूकदार-अनुकूल फ्री झोनचे महत्त्वही स्पष्ट करण्यात आले. आंतरराष्ट्रीय बाजारपेठांमध्ये प्रवेश, लॉजिस्टिक सुविधा आणि जागतिक नेटवर्कशी जोडणी यामुळे भारतीय कंपन्यांसाठी युएई हा प्रभावी प्रवेशद्वार ठरू शकतो, असे मत या बैठकीत व्यक्त करण्यात आले. भारताच्या वाढत्या आंतरराष्ट्रीय व्यापार सहभागाच्या पार्श्वभूमीवर भारतीय उद्योगांना जागतिक स्तरावर विस्तार करण्यासाठी आवश्यक व्यासपीठ उपलब्ध करून देण्यास फिक्की कटिबद्ध असल्याचे आयोजकांनी सांगितले.

# दृष्टिदोष असलेल्या खेळाडूंसाठी राष्ट्रीय T20 स्पर्धेला HCL फाउंडेशनचा पाठिंबा

पुणे : (समर्थ गांवकरी)

HCLTech

दृष्टिदोष असलेल्या क्रिकेटपटूंना राष्ट्रीय स्तरावर संधी उपलब्ध करून देण्यासाठी पुण्यात आयोजित राष्ट्रीय T20 स्पर्धेला HCL फाउंडेशनने पाठिंबा दिला आहे. HCLTechच्या कॉर्पोरेट सामाजिक जबाबदारी (CSR) उपक्रमांतर्गत 'स्पोर्ट्स फॉर चेंज' या मोहिमेद्वारे सर्वसमावेशक खेळांना चालना देण्याचा कंपनीचा उद्देश आहे. १५ ते १९ फेब्रुवारी दरम्यान होणारी ही स्पर्धा पुणे ब्लाइंड मेन्स असोसिएशन (PBMA) आणि ब्लाइंड क्रिकेट असोसिएशन (BCA) यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आली आहे. महाराष्ट्र, राजस्थान, मध्य प्रदेश, गुजरात, कर्नाटक, उत्तर प्रदेश, पश्चिम बंगाल आणि पंजाब या राज्यांतील आठ संघ स्पर्धेत सहभागी झाले असून सामने डेक्कन जिमखाना मैदान आणि पद्मावती येथील टेंबेकर मैदानावर खेळवले जात आहेत.

महाराष्ट्र दृष्टिहीन क्रिकेट संघटनेचे अध्यक्ष रवी वाघ यांनी सांगितले की, २०११ मध्ये राज्यस्तरीय स्पर्धा म्हणून सुरू झालेल्या या स्पर्धेने आता राष्ट्रीय स्तरावर महत्त्वाचे स्थान मिळवले आहे. वर्ल्ड कप लीग सामने, राष्ट्रीय संघ निवड चाचण्या आणि विविध राज्यस्तरीय व आंतरराष्ट्रीय स्पर्धांचे आयोजन या माध्यमातून होत असल्याने स्पर्धेची व्याप्ती वाढत आहे. पुणे ब्लाइंड मेन्स असोसिएशनचे अध्यक्ष राजेश शाह यांनी सांगितले की, ब्लाइंड क्रिकेट असोसिएशनच्या सहकार्याने समावेशक खेळांना सातत्याने प्रोत्साहन दिले जात असून दृष्टिदोष असलेल्या खेळाडूंना देशभर स्पर्धात्मक संधी उपलब्ध होत आहेत.

HCL फाउंडेशनच्या संचालिका डॉ. निधी पुंधीर यांनी सांगितले की, गेल्या दशकभरापासून 'स्पोर्ट्स फॉर चेंज' उपक्रमाद्वारे तळागाळातील खेळाडूंना संधी, प्रशिक्षण आणि आवश्यक सुविधा उपलब्ध करून दिल्या जात आहेत. ही T20 स्पर्धा सुप्त क्षमतांना वाव देण्याबरोबरच प्रतिष्ठा आणि उत्कृष्टतेला प्रोत्साहन देणारी ठरत आहे.

स्पर्धेदरम्यान सहभागी खेळाडूंना निवास, भोजन, प्रवास सहाय्य, वैद्यकीय सेवा, क्रीडा साहित्य आणि स्थानिक वाहतूक यांसारख्या सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

# उद्योजकांचे डिजिटल सक्षमीकरण

पुणे : (समर्थ गांवकरी)

डिजिटल अर्थव्यवस्थेत ग्रामीण महिला उद्योजकांचा सहभाग वाढवण्यासाठी नॅसकॉम फाउंडेशनने टिएटोव्हरीच्या सहकार्याने २५० महिलांना डिजिटल व आर्थिक कौशल्यांचे प्रशिक्षण दिले आहे. या उपक्रमामुळे महिलांची व्यावसायिक क्षमता मजबूत झाली असून त्यांना डिजिटल माध्यमांतून उत्पन्न वाढविण्यास मदत झाली आहे. पुणे जिल्ह्यातील आंबेगाव, चाकण, हवेली, जुन्नर, खेड आणि मंचर या भागांमध्ये राबविण्यात आलेल्या या कार्यक्रमांतर्गत हस्तकला, हातमाग, उत्पादन आणि प्रक्रिया क्षेत्रातील महिला उद्योजकांना मार्गदर्शन करण्यात आले. स्मार्टफोन आणि इंटरनेटचा व्यवसायासाठी प्रभावी वापर, डिजिटल मार्केटिंग, ऑनलाइन पेमेंट, ई-अकाउंटिंग आणि सरकारी योजनांची माहिती यांसारख्या विषयांवर ५० तासांचे प्रशिक्षण देण्यात आले.

# रॉयल स्टॅगकडून '#RS कोड' मोहिमेचा खुलासा

■ रोहित शर्मा आणि पॅडी अपटोनसोबत यशाची चार सूत्रे मांडली

मुंबई : (समर्थ गांवकरी)




क्रिकेट विश्वात उत्साह शिगेला पोहोचलेला असताना रॉयल स्टॅग पॅकेज्ड ड्रिंकिंग वॉटरने 'रॉयल स्टॅग कोड ऑफ लार्ज' (#RS कोड) हा डेटा-आधारित अभिनव उपक्रम सादर केला आहे. भारतीय संघाचा माजी कर्णधार रोहित शर्मा आणि मेंटल कंडिशनिंग प्रशिक्षक पॅडी अपटोन यांच्या सहकार्याने ही मोहीम राबविण्यात येत असून यशामागील मूलभूत तत्त्वांचा शोध घेण्याचा प्रयत्न या माध्यमातून केला जात आहे.

या मोहिमेत यशाचा अर्थ चार महत्त्वाच्या गुणांमधून उलगडण्यात आला आहे. निःस्वार्थीपणा, उत्साह, निर्भीडपणा आणि प्रेरणादायी नेतृत्व या गुणांच्या आधारे व्यक्ती आपल्या यशाचा मार्ग कसा घडवू शकते, हे मांडण्यात आले आहे. रोहित शर्माच्या कारकिर्दीतील कामगिरीचे सखोल डेटा विश्लेषण करून हे गुण अधोरेखित करण्यात आले आहेत.

दोन आयसीसी T20 विश्वचषक जिंकणारा एकमेव भारतीय खेळाडू म्हणून रोहित शर्मा यांची ओळख आहे. त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील सातत्य, संघभावना आणि धाडसी नेतृत्व या वैशिष्ट्यांना 'लिव्हिंग इट लार्ज' या ब्रँड तत्त्वज्ञानाशी जोडत मोहिमेची संकल्पना विकसित करण्यात आली आहे.

या उपक्रमाला अधिक विश्वासार्हता मिळावी यासाठी पॅडी अपटोन यांचा विषयतज्ज्ञ म्हणून समावेश करण्यात आला आहे. कामगिरीसंबंधित डेटाचे विश्लेषण करून त्यातून प्रेरणादायी दृष्टिकोन निर्माण करण्याचे काम त्यांनी केले आहे.

'#RS कोड' ही डिजिटल स्वरूपातील मोहिम असून ती टप्प्याटप्प्याने सादर करण्यात आली आहे. सुरुवातीला रोहित शर्मा आणि पॅडी अपटोन यांच्या टीझरद्वारे उत्सुकता निर्माण करण्यात आली, त्यानंतर टॉक शोच्या माध्यमातून या उपक्रमाचा अधिकृत खुलासा करण्यात आला. या सत्रात क्रिकेटपटू सूर्यकुमार यादव यांची उपस्थितीही पाहायला मिळाली.

मोहिमेचा एक महत्त्वाचा भाग म्हणजे एआय-आधारित '#RS कोड फाइंडर' टूल. या माध्यमातून चाहत्यांना काही प्रश्नांची उत्तरे देऊन स्वतःचा वैयक्तिक 'कोड ऑफ लार्ज' शोधण्याची संधी दिली जाते. त्यानंतर रोहित शर्माकडून वैयक्तिक व्हिडिओ संदेशाद्वारे हा कोड सादर केला जातो.

# कोमेड-के व युनि-गॉज २०२६ प्रवेश परीक्षा ९ मे रोजी

पुणे : (समर्थ गांवकरी)




अभियांत्रिकी पदवी अभ्यासक्रमांसाठी महत्त्वाची मानली जाणारी कोमेड-के यूजीईटी आणि युनि-गॉज २०२६ प्रवेश परीक्षा शनिवार, ९ मे २०२६ रोजी आयोजित करण्यात येणार आहे. देशभरातून सुमारे १.४० लाख विद्यार्थी या परीक्षेला बसण्याची अपेक्षा आहे.

ही राष्ट्रीय स्तरावरील संगणक-आधारित परीक्षा भारतातील २०० हून अधिक शहरांमध्ये आणि ४०० पेक्षा अधिक केंद्रांवर होणार असून कर्नाटकातील १५० हून अधिक अभियांत्रिकी महाविद्यालयांसह देशातील ३० पेक्षा जास्त खाजगी व स्वयं-अर्थसहाय्यित विद्यापीठांमध्ये बीई/बीटेक प्रवेशासाठी हा प्रमुख मार्ग मानला जातो.

कर्नाटक विनाअनुदानित खाजगी अभियांत्रिकी महाविद्यालये संघटना (KUPECA) आणि युनि-गॉज सदस्य संस्थांशी संलग्न महाविद्यालयांमध्ये प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या उमेदवारांसाठी ही परीक्षा घेतली जाते. देशभरातील पात्र विद्यार्थ्यांना अर्ज करण्याची संधी उपलब्ध आहे.

अर्ज प्रक्रिया ३ फेब्रुवारी ते १६ मार्च २०२६ दरम्यान ऑनलाइन होणार असून संपूर्ण परीक्षा व अर्ज प्रक्रिया डिजिटल पद्धतीने पार पडणार आहे. पात्रता निकष, अर्ज प्रक्रिया आणि मार्गदर्शक तत्त्वांची माहिती अधिकृत संकेतस्थळांवर उपलब्ध आहे.

कोमेड-केने २०२२ मध्ये 'कोमेड-के केअर्स इनोव्हेशन हब' उपक्रम सुरू केला होता. शैक्षणिक अभ्यास आणि उद्योग क्षेत्रातील गरजा यांतील दरी कमी करण्यासाठी कौशल्याधारित प्रशिक्षण देणे हा या उपक्रमाचा उद्देश आहे. सध्या कर्नाटकात नऊ इनोव्हेशन हब कार्यरत असून त्यामध्ये जलद प्रोटोटाइपिंग साधने, ३डी प्रिंटर, एआर/व्हीआर तंत्रज्ञान, रोबोटिक्स लॅब आणि आधुनिक सुविधा उपलब्ध आहेत.

या हबमधून नवोन्मेष, उद्योजकता, प्रोटोटाइपिंग, इंटरनेट ऑफ थिंग्ज (IoT), डेटा सायन्स, मशीन लर्निंग, रोबोटिक्स आणि अप्लाइड एआय यांसारख्या भविष्योन्मुख क्षेत्रांमध्ये प्रशिक्षण दिले जाते. या उपक्रमामुळे कौशल्याधारित प्रशिक्षण सुरू करणारे कर्नाटक हे देशातील पहिले राज्य ठरले आहे.

कोमेड-केचे कार्यकारी सचिव डॉ. कुमार यांनी सांगितले की, विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता आणि अभिरुचीला प्राधान्य देत पारदर्शक व निष्पक्ष प्रवेश प्रक्रिया राबविण्याचा संस्थेचा प्रयत्न आहे. तर ईआर फाउंडेशनचे सीईओ पी. मुरलीधर यांनी युनि-गॉजद्वारे गुणवत्तापूर्ण आणि वस्तुनिष्ठ प्रवेश प्रक्रिया कायम ठेवण्यावर भर असल्याचे सांगितले.

विद्यार्थी आणि पालकांनी अर्ज व माहितीसाठी केवळ अधिकृत संकेतस्थळांचा वापर करावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

IDFC FIRST Bank

# 'हॅलो कॅशबॅक' क्रेडिट कार्ड लॉंच

पुणे : (समर्थ गांवकरी)

आयडीएफसी फर्स्ट बँकेने फिक्स्ड डिपॉझिट (FD) समर्थित 'हॅलो कॅशबॅक' क्रेडिट कार्ड लॉंच केले असून डिजिटल पेमेंट करणाऱ्या ग्राहकांसाठी आणि विशेषतः १८ वर्षांवरील तरुणांसाठी हे कार्ड तयार करण्यात आले आहे. ऑनलाइन आणि यूपीआय व्यवहारांवर कॅशबॅक देत क्रेडिट इतिहास तयार करण्यास मदत करणे हा या कार्डचा उद्देश आहे. या कार्डमध्ये टायर्ड कॅशबॅक स्ट्रक्चर देण्यात आले आहे. दरमहा ₹१०,००० पर्यंतच्या ऑनलाइन खर्चावर ३% कॅशबॅक आणि ₹१०,००० पेक्षा जास्त ऑनलाइन खर्चावर ५% कॅशबॅक मिळतो. इन-स्टोअर, कॉन्टॅक्टलेस आणि यूपीआय व्यवहारांवर १% कॅशबॅक देण्यात येतो.

# विमाननगर येथे बॅगेलस्टाइनचे पाचवे स्टोअर

पुणे : (समर्थ गांवकरी)



फ्रान्समधील प्रसिद्ध बॅगेल ब्रँड 'बॅगेलस्टाइन'ने फिनिक्स मार्केटसिटी, विमाननगर येथे पाचव्या स्टोअरचे उद्घाटन करत भारतातील आपली उपस्थिती अधिक मजबूत केली आहे. फ्रँचायझी इंडियाच्या माध्यमातून सुरू झालेल्या या विस्ताराला पुण्यातील नवीन आउटलेटमुळे गती मिळाली असून हे स्टोअर देशातील बॅगेलस्टाइनचे शुद्ध शाकाहारी स्वरूपातील पहिले रेस्टॉरंट ठरले आहे. पुणे हे आंतरराष्ट्रीय खाद्यसंस्कृती आणि आधुनिक जीवनशैलीसाठी महत्त्वाचे केंद्र म्हणून झपाट्याने पुढे येत आहे. तरुण व्यावसायिक, विद्यार्थी आणि उद्योजकांची वाढती संख्या तसेच प्रीमियम कॅफे आणि गॉरमेट डायनिंगची मागणी लक्षात घेता फिनिक्स मार्केटसिटी हे ठिकाण ब्रँडच्या विस्तारासाठी धोरणात्मकदृष्ट्या महत्त्वाचे मानले जात आहे. बॅगेल्सची वाढती लोकप्रियता आणि जलद सेवा देणाऱ्या पण गुणवत्तेला प्राधान्य देणाऱ्या खाद्यपर्यायांची मागणी लक्षात घेऊन बॅगेलस्टाइनचा मेनू तयार करण्यात आला आहे. ओव्हन-फ्रेश हस्तनिर्मित शाकाहारी बॅगेल्स, प्रीमियम फिलिंग्ज, सँडविचेस, स्प्रेड्स, कॉफी, पेये आणि मिष्टान्न यांचा समावेश असलेला हा मेनू ग्राहकांना कॅज्युअल पण प्रीमियम कॅफे अनुभव देतो.

फ्रँचायझी इंडियाचे संस्थापक आणि अध्यक्ष गौरव मरिया यांनी सांगितले की, भारतासारख्या वेगाने वाढणाऱ्या बाजारपेठांमध्ये जागतिक खाद्यब्रँडसाठी फ्रेंचायझिंग हा सर्वात प्रभावी विस्ताराचा मार्ग ठरत आहे. देशातील तरुण लोकसंख्या, वाढती उपभोग क्षमता आणि आंतरराष्ट्रीय चवींची मागणी यामुळे QSR आणि कॅफे ब्रँडसाठी भारत आकर्षक ठिकाण बनत आहे. बॅगेलस्टाइनचे (पुणे, महाराष्ट्र आणि गोवा) क्षेत्रीय विकासक सपना पोद्दार आणि मोहित सिंघल यांनी सांगितले की, पुणे हे प्रीमियम तसेच सहज उपलब्ध अशा जेवणाच्या पर्यायांसाठी वेगाने विकसित होणारे बाजारपेठ आहे.

# गोबोल्ट–मस्टँग भागीदारीचा विस्तार; ३,००० कोटी महसुलाचे लक्ष्य

पुणे : (समर्थ गांवकरी)




भारतातील वेअरेबल आणि ऑडिओ उपकरण क्षेत्रात वेगाने वाढणाऱ्या गोबोल्ट कंपनीने 'मस्टँग' ब्रँडसोबतची भागीदारी अधिक मजबूत करत आर्थिक वर्ष २०२७-२८ पर्यंत ३,००० कोटी रुपयांच्या महसुलाचे उद्दिष्ट जाहीर केले आहे. या विस्ताराच्या पार्श्वभूमीवर कंपनीने तीन नवीन स्मार्टवॉचेस आणि एक टीडब्ल्यूएस इयरबड्स बाजारात सादर केले आहेत.

स्टॅलियन, रेसर आणि मसल या तीन स्मार्टवॉचेससह 'मस्टँग स्प्रिंट टीडब्ल्यूएस' इयरबड्स या नव्या उत्पादनांची घोषणा करण्यात आली. प्रीमियम श्रेणीतील उत्पादनांवर अधिक लक्ष केंद्रित करत 'मस्टँग' पोर्टफोलिओ ऑडिओ उपकरणांच्या पलीकडे वेअरेबल्सपर्यंत विस्तारण्याचा कंपनीचा मानस आहे.

आर्थिक वर्ष २०२५ मध्ये सुमारे ८०० कोटी रुपयांचा महसूल नोंदवल्यानंतर गोबोल्टने प्रीमियमायझेशन, नफा वाढ आणि ब्रँडची मजबूत ओळख निर्माण करणे या तीन प्रमुख उद्दिष्टांवर लक्ष केंद्रित केले आहे. सवलतीवर आधारित विक्रीपेक्षा उच्च दर्जाच्या उत्पादनांच्या पोर्टफोलिओवर भर देत आर्थिक वाढ साधण्याची रणनीती कंपनीने आखली आहे.

# एसएमईंसाठी जगातील सर्वात मोठ्या बॉक्स क्रिकेट स्पर्धेचा विक्रम

## क्रायसॅलिस एंटरप्रेन्योर फोरमची गिनीजमध्ये नोंद

पुणे : (समर्थ गांवकरी)




क्रायसॅलिस एंटरप्रेन्योर फोरम (सीईएफ) यांनी १५ फेब्रुवारी रोजी पुणे येथे जगातील सर्वात मोठ्या बॉक्स क्रिकेट स्पर्धेचा यशस्वी आयोजन करून गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड्स मध्ये आपले नाव नोंदवले. ही कामगिरी विशेष आहे कारण बॉक्स क्रिकेटसाठी यापूर्वी जगात कोणताही गिनीज विक्रम अस्तित्वात नव्हता—अशा प्रकारे (सीईएफ) ने नवीन गिनीज शीर्षक निर्माण केले. या विक्रमाकडे नेणाऱ्या प्रवासाची सुरुवात ३ फेब्रुवारी २०२६ रोजी बावधन, पुणे येथे क्रायसॅलिस एसएमई लीगच्या औपचारिक उद्घाटनाने झाली. पुढे हीच स्पर्धा आतापर्यंतची सर्वात मोठी बॉक्स क्रिकेट स्पर्धा ठरली. या लीगमध्ये ६६ संघ सहभागी झाले होते. प्रत्येक संघात ११ वेगवेगळे खेळाडू असून एकूण ७२६ कर्मचारी सहभागी झाले.या उपक्रमाचे वैशिष्ट्य म्हणजे प्रत्येक संघ पूर्णपणे लघु व मध्यम उद्योगांतील (एसएमईएस) कर्मचाऱ्यांपासूनच बनलेला होता. पुणे, मुंबई आणि आसपासच्या भागांतील ३० पेक्षा अधिक उद्योगांचे प्रतिनिधित्व करत, या स्पर्धेने भारताच्या अर्थव्यवस्थेचा खरा कणा असलेल्या कर्मचारी यांचा सन्मान केला. २०१२ साली स्थापन झालेला क्रायसॅलिस एंटरप्रेन्योर फोरम १५ उद्योजकांच्या छोट्या गटापासून आज १५०० हून अधिक उद्योजकांचे सशक्त व्यासपीठ बनला आहे. फोरमचे अध्यक्ष मनीष गुप्ता असून त्यांच्या दूरदृष्टीने धाडसी कल्पना मोठ्या चळवळींमध्ये रूपांतरित होत आल्या आहेत आणि उद्योजक व त्यांच्या टीम्स यांना एकत्र आणले आहे. श्री. गुप्ता यांच्या नेतृत्वाखाली हा सीईएफ चा तिसरा जागतिक विक्रम ठरला आहे. यापूर्वी फोरमने २०१४ मध्ये स्कायडायव्हिंगसाठी लिम्का बुक ऑफ रेकॉर्ड्स मध्ये नोंद केली होती तसेच स्कुबा डायव्हिंग मध्ये गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड्स मिळवला होता. क्रायसॅलिस एसएमई लीग हा सीईएफ चा पहिला जमिनीवर आधारित (लँड-बेस्ड) गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड असून, बॉक्स क्रिकेटच्या माध्यमातून एकत्रित परिणाम साधला गेला. गिनीज वर्ल्ड रेकॉर्डचे प्रमाणपत्र प्रवीण पटेल, गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड्सचे वरिष्ठ अधिकृत निर्णायक तसेच रॉयल ब्रिटिश एअर फोर्सचे निवृत्त अभियंता, यांनी संपूर्ण स्पर्धेची कठोर तपासणी केल्यानंतर प्रदान केले. गिनीजने ठरवलेली मार्गदर्शक तत्त्वे अत्यंत कठोर होती आणि फोरमने ती पूर्ण शिस्तीने व काटेकोरपणे पाळली. संबोधित करताना श्री. पटेल म्हणाले "इतक्या मोठ्या स्तरावर स्पर्धा आयोजित करताना फोरमने उत्तम शिस्त आणि प्रचंड उत्साह दाखवला आहे. या जागतिक विक्रमासाठी किमान ५०० सहभागी आवश्यक होते, तर फोरमने ७२६ सहभागींसह हा विक्रम साध्य केला. गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड्स उत्कृष्ट मानवी प्रयत्नांचा गौरव करते आणि ही स्पर्धा त्याचे जिवंत उदाहरण आहे—१३ दिवसांत सकाळपासून उशिरा रात्रीपर्यंत १३५ सामने, ७५ हून अधिक संस्थांचा सहभाग आणि ७२६ लोकांना एकत्र आणणे हे खरोखरच एक अवाढव्य कार्य होते, जे क्रायसॅलिस एंटरप्रेन्योर फोरमने यशस्वीपणे पूर्ण केले." गिनीज प्रमाणपत्र मनीष गुप्ता, अध्यक्ष—क्रायसॅलिस एंटरप्रेन्योर फोरम, यांच्यासह रचना गुप्ता , संस्थापक आणि विदिशा कुकरेजा, उपाध्यक्ष, क्रायसॅलिस बिझनेस सोल्युशन्स प्रायव्हेट लिमिटेड यांनी स्वीकारले. या विक्रमापलीकडे, क्रायसॅलिस एसएमई लीग ही टीम बॉन्डिंग आणि संस्थात्मक संस्कृती मजबूत करण्यासाठी एक प्रभावी व्यासपीठ ठरली. या उपक्रमामुळे कर्मचाऱ्यांना हे जाणवले की त्यांचे उद्योजक व व्यावसायिक नेते केवळ संसाधनांद्वारेच नव्हे, तर वेळ, विश्वास आणि सामायिक अनुभवांद्वारेही त्यांच्यात गुंतवणूक करत आहेत.

# कोतुळेश्वर महाराजांच्या महाशिवरात्री यात्रेला ऐतिहासिक प्रतिसाद

■ दोन लाखांहून अधिक भाविकांची उपस्थिती!

**कोतुळ : (समर्थ गांवकरी)**

कोतुळ (ता. अकोले, जि. अहिल्यानगर) – मुळा नदीच्या पवित्र काठावर वसलेले प्राचीन व जागृत देवस्थान कोतुळेश्वर महादेव मंदिर येथे महाशिवरात्री निमित्त भव्य यात्रोत्सव मोठ्या उत्साहात व भक्तिभावात पार पडला. यंदाच्या यात्रेत सुमारे दोन लाखांहून अधिक भाविकांनी कोतुळेश्वर महाराजांचे दर्शन घेतल्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला. प्राचीन काळी कुंतलपुर नगरी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या कोतुळ गावाला ऐतिहासिक पार्श्वभूमी लाभलेली आहे. पांडवकालीन उल्लेखांमध्ये कुंतलेश्वर नावाचा संदर्भ आढळतो, असे जाणकार सांगतात. ग्रामपंचायत कार्यालयाच्या पाठीमागे पूर्वेकडे आजही गढीचे अवशेष व भक्कम तटबंदी उभी असून, या भागाच्या





ऐतिहासिक वैभवाची साक्ष देतात. कालांतराने कुंतलेश्वरांचे कोतुळेश्वर असे नामकरण झाले. पूर्वी साध्या कौलारू स्वरूपातील असलेले मंदिर भाविकांच्या सहकार्याने जिर्णोद्धार करण्यात आले. मंदिराच्या सुशोभीकरणानंतर परिसर अधिक आकर्षक बनला असून, वर्षभर भाविकांची वर्दळ वाढली आहे. कोतुळेश्वर महाराज हे नवसाला पावणारे दैवत म्हणून पंचक्रोशीत श्रद्धास्थान मानले जाते. मंदिर परिसरात पूर्वी 'सहस्त्रधारा' म्हणून ओळखली जाणारी

**पत्रकार – सुनिल आरोटे, कोतुळ**

सळसळती पाण्याची धारा बाराही महिने प्रवाहित असायची. १९९० नंतर विकासकामे व भूस्खलनामुळे त्या धारांचा लोप झाला असला तरी आजही त्यांचे अवशेष व खुणा येथे पाहायला मिळतात.

स्थानिक परंपरेनुसार वनवास काळात राम यांनी या सहस्त्रधारा परिसरात काही काळ वास्तव्य केल्याचे सांगितले जाते. पुढे ते टाकेदकडे मार्गस्थ झाल्याची आख्यायिका आहे. तसेच अगस्त्य ऋषी यांनीही कुंतलपुर नगरीत काही काळ तपश्चर्या केल्याची लोकश्रुती आहे. महाशिवरात्री निमित्त अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते. महाराष्ट्रातील नामवंत कीर्तनकारांनी आठ दिवस कीर्तनसेवा अर्पण केली. यात्रेदरम्यान अनेक दात्यांनी अन्नदान सेवा राबवून हजारो भाविकांना महाप्रसादाचा लाभ दिला. यात्राकाळात मंदिर परिसरात विविध धार्मिक साहित्य, पूजासामग्री व स्थानिक वस्तूंची दुकाने उभारण्यात आली होती. खरेदी-विक्रीतून लाखो रुपयांची उलाढाल झाली. भाविकांच्या गर्दीमुळे संपूर्ण परिसर भक्तिमय वातावरणाने दुमदुमून गेला होता.

यात्रेदरम्यान वाहतूक नियंत्रण, सुरक्षा व्यवस्था व स्वच्छतेसाठी स्थानिक प्रशासन, ग्रामपंचायत व स्वयंसेवकांनी विशेष नियोजन केले होते. भाविकांना दर्शनासाठी सुलभ व्यवस्था करण्यात आली होती. कोतुळेश्वर महाराजांचा महाशिवरात्री यात्रोत्सव हा केवळ धार्मिक सोहळा नसून इतिहास, श्रद्धा आणि सामाजिक ऐक्य यांचा संगम असल्याचे यावेळी प्रकर्षाने जाणवले.



ठाणे : डिजिटल मीडिया संपादक पत्रकार संघटना महाराष्ट्र राज्य संस्थापक अध्यक्ष राजा माने यांच्या आदेशाने ठाणे जिल्हा समन्वयक पदी डिजिटल पत्रकार शुभम कवे यांची नियुक्ती करण्यात आली. सदरचे नियुक्तीपत्र कोकण पदवीधर मतदारसंघाचे आमदार निरंजनजी डावखरे यांच्या हस्ते देण्यात आले. यावेळी संघटनेचे सचिव यतीन पवार, खजिनदार गणेश कुरकुंडे, प्रसिद्धी प्रमुख सौरभ डाके, ज्येष्ठ पत्रकार दीपक शेलार, दीपक कुरकुंडे, निलेश मंडलिक, सचिन देशमाने, गणेश भोईटे, किशोर जाधव, प्रवीण कामत, नितीन दूधसागर, संदीप लबडे, राजेश शेटकर, अमर राजभर, जयश्री शेट्टी, संपदा शिंदे, वंशिका चाचे पत्रकार बांधव उपस्थित होते. ( फोटो - संतोष पडवळ )

# 'द मिस्टीक आय चा उपक्रम'

■ "शिवोहम"भजन संध्येतून शिव आराधना व ध्यान साधना शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद

■ महाशिवरात्रीच्या पावन दिनी भजन,ध्यान व मंत्र जपाचा दिव्य अनुभव - साक्षी मुनोत

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

महाशिवरात्रीच्या पावन दिनी शिवपार्वतीचा सोहळा संपन्न झाला होता. महाशिवरात्रीच्या दिवशी शिव आराधना केल्यास सुख, समाधान व शांती लाभते.

भजन आणि जागरण केल्यास भगवान शिव प्रसन्न होतात. धावपळीच्या युगात प्रत्येकाला ताणतणाव जाणवत असतो. या ताणतणावापासून मुक्ती मिळविण्यासाठी व मन शांती




मिळविण्यासाठी ध्यान धारणेची आवश्यकता आहे.शिव आराधना केल्याने नकारात्मक ऊर्जा नष्ट होऊन जीवनात सकारात्मकता येते. महाशिवरात्रीच्या पावन पर्वा निमित्त महादेवाच्या सानिध्यात आत्म शुद्धीचा पवित्र स्पर्श करणारा भजन,ध्यान व मंत्रजापाचा दिव्य अनुभव मिळतो.असे प्रतिपादन "द मिस्टिक आय" च्या संचालिका साक्षी मुनोत यांनी केले आहे. केशर गुलाब मंगल कार्यालय येथे महाशिवरात्री निमित्त "द मिस्टीक आय" या संस्थेमार्फत "शिवोहम" ध्यान शिबिराचे व भजन संध्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

दिपप्रज्वलन करुन भजन संध्या व ध्यान शिबिराचे उद्घाटन प्रमुख अतिथी लालचंद मुनोत, सौ सुकांता मुनोत,आनंदराम मुनोत, सौ.कमल मुनोत,द मिस्टिक आय च्या संचालिका साक्षी मुनोत आदींच्या हस्ते करण्यात आले. यावेळी भजन संध्येत शिवस्तुती,शिवतांडव,मन मेरा मंदिर, शिव मेरी पूजा... या भजनसंध्ये च्या कार्यक्रमातून शिव आराधना करण्यात आली.यावेळी साधक भजनामध्ये तल्लीन होऊन मंत्रमुग्ध झाले. भजन संध्येच्या कार्यक्रमात गायक राजेंद्र टाक व सौ. मधुवंती धर्माधिकारी यांनी शिव भजने गायीली.

# रविंद्र पानमंद यांच्या शेतात AI तंत्रज्ञानाचा वापर

**(सांगवडे,ता.मावळ) : (समर्थ गांवकरी)**

रविंद्र पानमंद यांच्या शेतामध्ये अलीकडे कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) तंत्रज्ञानाचा यशस्वीपणे वापर करण्यात आला. या आधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून जमिनीतील आर्द्रता, हवामान स्थिती आणि पाणी व्यवस्थापन यांचे अचूक निरीक्षण केले जात आहे. AI तंत्रज्ञानाच्या मदतीने जमिनीतील ओलावा (Moisture) तपासून पिकांना आवश्यकतेनुसार पाणी देण्याची सुविधा उपलब्ध झाली आहे. तसेच हवामानातील बदलांचा अंदाज घेऊन पाणी देण्याचे नियोजन अधिक प्रभावीपणे करता येत आहे. यामुळे पाण्याची बचत होऊन पिकांची वाढ सुधारण्यास मदत होत आहे.

# बसस्थानकाच्या स्लॅबवर 'मंजूर' ऐवजी अन्य कंपनीचे सिमेंट?

**हिंगोली : (समर्थ गांवकरी)**

■ निविदा अटींचा भंग झाल्याचा संशय; गुणवत्ता अहवाल गुलदस्त्यात

वसमत शहरात कोट्यवधी रुपयांच्या निधीतून उभारण्यात येत असलेल्या नवीन बसस्थानकाच्या बांधकामावर पुन्हा संशयाचे ढग दाटले आहेत. बसस्थानकाच्या मुख्य स्लॅबचे काँक्रिटीकरण नुकतेच पूर्ण करण्यात आले असून, या कामात निविदेत मंजूर असलेल्या सिमेंटऐवजी अन्य कंपनीचे सिमेंट वापरण्यात आल्याचा संशय व्यक्त केला जात आहे.

निविदा कागदपत्रांमध्ये सिमेंटसाठी ठरावीक कंपन्यांचेच साहित्य वापरणे बंधनकारक असताना प्रत्यक्ष ठिकाणी



यादीबाहेरील सिमेंटचा वापर झाल्याची चर्चा सुरू आहे. त्यामुळे नियमबाह्य साहित्य वापरून सार्वजनिक निधीचा गैरवापर झाल्याचा मुद्दा उपस्थित होत आहे.

विशेष म्हणजे, स्लॅबचे काँक्रिटीकरण पूर्ण होऊनही अद्याप नमुना चाचणी अहवाल, गुणवत्ता तपासणी अहवाल तसेच संबंधित अभियंत्याची लेखी मंजुरी सादर करण्यात आलेली नाही. त्यामुळे "काम योग्य झाले असेल, तर अहवाल व कागदपत्रे समोर का येत नाहीत?" असा सवाल नागरिक उपस्थित करीत आहेत.

तज्ज्ञांच्या मते, स्लॅबसारख्या महत्त्वाच्या बांधकामात हातोडी चाचणी, ध्वनीलहरी चाचणी तसेच कोर कापून प्रयोगशाळेमार्फत तपासणी करणे आवश्यक असते. मात्र यासंबंधी कोणताही अधिकृत अहवाल अद्याप समोर आलेला नाही.

या प्रकरणावर संबंधित विभाग व प्रशासनाकडून अद्याप अधिकृत भूमिका स्पष्ट करण्यात आलेली नाही. बसस्थानकाच्या मुख्य स्लॅबच्या काँक्रिटीकरणावेळी वाळूचा साठा कामाच्या ठिकाणी आढळून आला नाही. प्रत्यक्षात त्या ठिकाणी डस्टचाच साठा वापरण्यात आल्याचे छायाचित्रांमधून स्पष्ट दिसून येत आहे. आरसीसीसारख्या महत्त्वाच्या बांधकामासाठी दर्जेदार वाळूचा वापर अपेक्षित असताना डस्टचा वापर झाल्यास काँक्रिटच्या मजबुतीवर परिणाम होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे या स्लॅबची हातोडी चाचणी, ध्वनीलहरी चाचणी तसेच कोर कापून प्रयोगशाळेमार्फत तपासणी होणे आवश्यक ठरत आहे. मुख्य स्लॅब देखील डस्ट मध्ये पायाभरणीपासून बस स्थानकाचे बांधकाम हे डस्ट मध्ये तयार करण्यात आलेल्या आहेत व आता काही तासापूर्वी तयार करण्यात आलेले बस स्थानकाचे मुख्य स्लॅब देखील डस्ट मध्ये तयार केल्याचे पहावयास मिळाले आहे परंतु इस्टिमेट मध्ये धुतलेले वाळू असा स्पष्ट उल्लेख असताना प्रत्यक्षात मात्र डस्ट मध्ये स्लॅब तयार केला बांधकाम तज्ञांच्या मते सेंट्रिंग उघडतात डस्ट मध्ये तयार करण्यात आलेल्या तडे जातील असा दावा करत आहेत.

# गंभीर जखमी निराधाराचा उपचारापुर्वीच मृत्यु

**जामखेड : (समर्थ गांवकरी)**

■ सामाजिक कार्यकर्ते संजय कोठारी यांची तत्परता

शहरातील खर्डा चौकात जखमी अवस्थेत आढळलेल्या निराधार व्यक्तीस उपचारापुर्वीच मृत्यु झाला असुन, या निराधारास सामाजिक कार्यकर्ते संजय कोठारी यांनी दवाखान्यात दाखल केले. मात्र डॉक्टरांनी मृत घोषित केले.

शनिवारी (ता.१४) सकाळी १० वाजल्यापासून शहरातील खर्डा चौकात एक निराधार व्यक्ती रस्त्याच्या मध्यभागी जखमी अवस्थेत पडली असल्याचे सामाजिक कार्यकर्ते संजय कोठारी यांना प्रवीण होळकर यांनी फोनवर कळवले. यावर कोठारी यांनी दीपक भोरे ,ऋषिकेश शेळके, सत्यम भापकर यांना सोबत घेवून घटनास्थळी धाव घेतली. यावेळी हा निराधार व्यक्ती गंभीर



जखमी अवस्थेत होता. बऱ्याच दिवसापासून त्यांने आंघोळ केली नसल्याने, त्याची दुर्गंधी सुटली होती. पायावरून गाडी गेली असावी पाय मोडलेल्या अवस्थेत होता. अशा परिस्थितीत संजय कोठारी यांनी स्वतः आपल्या सहकार्यांसमवेत त्यास रूग्णवाहिकेतून ग्रामीण रुग्णालयात दाखल केले .तेथे वैद्यकीय अधिकारी डॉ कुंडलिक अवसरे यांनी त्यास मृत घोषित केले. दरम्यान या निराधार व्यक्तीची ओळख पटली असून, अशोक दिगंबर जाधव ( वय ४६ , राहणार जामखेड ) असे त्याचे नाव असल्याची माहिती सामाजिक कार्यकर्ते संजय कोठारी यांनी दिली. कोठारी यांनी पोलीस निरीक्षक दशरथ चौधरी यांना माहिती दिली असून, पुढील तपास चालू आहे. यावेळी संजय कोठारी म्हणाले, शनिवारी बाजार दिवस असल्याने, खर्डा चौकात सकाळी दहा वाजलेपासून दुपारी एक वाजेपर्यंत कुणीही त्याच्याकडे लक्ष दिले नाही बरेच लोक आले गेले. मला फोन आल्यानंतर मी ताबडतोब गेलो. परंतु सबंधीत निराधार व्यक्तीची परिस्थिती खूपच गंभीर असल्यामुळे त्यांना कुणीही हात लावण्यास तयार होत नव्हते. यावेळी पोलीस कॉन्स्टेबल नासिर खान आणि एक वाटसरू आणि माझे सहकारी ऋषिकेश शेळके ,दीपक भोरे आरोग्य मित्र सत्यम भापकर यांनी मदत केली.

# कोंडलिंगेश्वर गड दीपोत्सवाने उजळला

**तामसा : (समर्थ गांवकरी)**

हदगाव तालुक्यातील शिवपुरी येथील श्रीक्षेत्र कोंडलिंगेश्वर महादेव मंदिराचा गड महाशिवरात्रीनिमित्त आयोजित रुद्रोपासना महोत्सवानिमित्त दीपोत्सवांनी उजळला आहे. येथील महादेव मंदिर अंदाजे सातशे फूट उंच असून मंदिराकडे जाण्यासाठी नागमोडी आकाराचा रस्ता रात्री असंख्य दिव्यांनी दुतर्फा उजळत आहे. मंदिराचे महंत बिरागीदास महाराज यांच्या संकल्पनेतून ता. ९ फेब्रुवारी पासून महाशिवरात्री पर्यंत रोज सायंकाळी दीपोत्सवासाठी पंचक्रोशीतील शेकडो भाविक विशेषता महिलांची उपस्थिती लाभत आहे. लखलखत्या दिव्यांनी मंदिराकडे जाणारा रस्ता उजळून निघालेलं सौंदर्य न्याहाळण्यासाठी रोज रात्री गर्दी होत आहे.

# समर्थ शैक्षणिक संकुलात निर्भय कन्या अभियानाचे आयोजन

**बेल्हे : (समर्थ गांवकरी)**

समर्थ रुरल एज्युकेशनल इन्स्टिट्यूट संचलित समर्थ शैक्षणिक संकुल बेल्हे येथे नुकतेच सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ विद्यार्थी विकास मंडळ समर्थ कॉलेज ऑफ इंजिनियरिंग अँड मॅनेजमेंट,समर्थ कॉलेज ऑफ कॉम्प्युटर सायन्स व समर्थ लॉ कॉलेज यांच्या संयुक्त विद्यमाने "निर्भय कन्या अभियाना" अंतर्गत संकुलातील विद्यार्थीनींसाठी 'कराटे प्रशिक्षण कार्यक्रमा' चे आयोजन करण्यात आले होते. या अभियानामध्ये संकुलातील ४५० हून अधिक विद्यार्थिनी सहभागी झाल्या होत्या.

स्त्री-सबलीकरण आणि सक्षमीकरण काळाची गरज आहे.संकुलामध्ये महिला सबलीकरण,व्यक्तिमत्व विकास,स्वास्थ्य,महिला उद्यमशीलता,स्त्री-पुरुष समानता यांसारख्या उपक्रमांच्या माध्यमातून विद्यार्थिनींना



बौद्धिक,शारीरिक,मानसिक व भावनिक इ.स्तरावर सक्षम बनविण्याच्या दृष्टीने प्रयत्न केला जातो.

कार्यक्रमाचा मुख्य उद्देश विद्यार्थिनींमध्ये आत्मसंरक्षणाचे कौशल्य विकसित करणे,आत्मविश्वास वाढवणे व सुरक्षिततेबाबत जनजागृती करणे हा होता.

कार्यक्रमासाठी प्रमुख मार्गदर्शक म्हणून पोलीस हवालदार सुनील गिरी,दिपक नागरे उपस्थित होते. तसेच कराटे प्रशिक्षक महेंद्र गुळवे व किशोर काकडे यांनी विद्यार्थिनींना प्रत्यक्ष प्रशिक्षण देत आत्मसंरक्षणाच्या विविध तंत्रांचे प्रात्यक्षिक दाखवले. प्रशिक्षणादरम्यान महिलांच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक खबरदारी, आत्मरक्षणासाठी त्वरित वापरता येणाऱ्या उपाययोजना व मानसिक सक्षमतेचे महत्त्व यावर मार्गदर्शन करण्यात आले.

# प्रा. डॉ. सुनिल मोहटे यांची राष्ट्रीय सेवा योजना जिल्हा समन्वयक म्हणून निवड

**अकोले : (समर्थ गांवकरी)**

अकोले येथील अगस्ति कला वाणिज्य व दादासाहेब रूपवते विज्ञान महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. सुनिल मोहटे यांची राष्ट्रीय सेवा योजना अहिल्यानगर उत्तर विभागासाठी जिल्हा समन्वयक म्हणून निवड करण्यात आली आहे. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक डॉ. गणेश भामे यांनी त्यांच्या निवडीचे पत्र महाविद्यालयाला पाठविले आहे. डॉ. मोहटे यांनी यापूर्वीही राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून ग्रामीण भागासाठी भरीव काम केले आहे. तसेच पुणे ते पंढरपूर राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून पार पडलेल्या स्वच्छ वारी स्वस्थ वारी निर्मल वारीचे संघनायक म्हणूनही त्यांनी काम केले आहे. त्यांना यापूर्वी सन २०१८-१९



या वर्षी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाकडून राष्ट्रीय सेवा योजना उत्कृष्ट कार्यक्रम अधिकारी पुरस्कार देऊन गौरविण्यात आले आहे. डॉ. मोहटे यांच्या निवडी बद्दल अकोले तालुका एज्युकेशन सोसायटीचे कार्यकारी विश्वस्त माजी आमदार वैभवराव पिचड, संस्थेचे अध्यक्ष इंजिनिअर सुनील दातीर, सचिव सुधाकरराव देशमुख, सर्व कार्यकारीणी सदस्य, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. भास्कर शेळके, सर्व प्राध्यापक व प्रशासकीय कर्मचारी तसेच विद्यार्थ्यांनी अभिनंदन केले आहे.

# केमीकल वापरून दुध तयार करण्याचा गोरख धंदा

**जामखेड तालुका : (समर्थ गांवकरी)**

स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने अन्न आणि औषध प्रशासनाच्या मदतीने जामखेड तालुक्यातील फक्राबाद येथे केमिकल व इतर पदार्थांचा वापर करून कृत्रिम दूध तयार करून विक्री करित असलेल्या ठिकाणी छापा टाकला. मागिल दोन महिन्यांपासून रामदास नवनाथ उबाळे या व्यक्तीच्या शेतवस्तीवरील घरात दुध भेसळीचा हा गोरखधंदा सुरु होता. पोलिसांकडून दुध तयार करण्यासाठी लागणारे ऑईल, केमीकल पावडर, केमीकल पासुन तयार केलेले दुध, व दोन चारचाकी वहाने असा एकुण 17 लाख 32 हजार 816 रुपये कीमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.



याप्रकरणी तीन जणांविरोधात जामखेड पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

रामदास नवनाथ उबाळे वय 46 रा. फक्राबाद. ता. जामखेड, समीर कमरुद्दीन शेख, वय 30 वर्षे. रा. उंबरे ता. राहुरी व आफताब कलीम शेख वय 28 वर्षे रा. शुक्लेश्वर चौक, राहुरी अशा तीन आरोपींची नावे आहेत. याबाबत अधिक माहिती अशी की स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक किरणकुमार कबाडी यांना जामखेड तालुक्यातील फक्राबाद याठिकाणी दूध भेसळीचा गोरखधंदा धंदा सुरू असल्याची गुप्त माहिती मिळाली. याच आनुशंगाने अन्न व औषध प्रशासन विभागाचे निरीक्षक राजेश बडे यांच्या सह त्यांच्या पथकाने शनिवार दि 14 फेब्रुवारी रोजी सकाळी फक्राबाद येथे घटनास्थळी छापा टाकला.

अन्न आणि प्रशान विभागाचे अधिकारी व पोलीस पथकाने दुध संकलन केंद्राच्या ठिकाणची पाहणी केली असता सदर ठिकाणी दुध तयार करण्यासाठी वापरले जाणारे 6 ड्रममध्ये 1198 लिटर Paraffin नावाचे केमीकल व दुध पावडर मिळून आली. सदर केमीकल बाबत ताब्यातील इसमांकडे विचारपुस करता त्यांनी सदरच्या केमीकल पासुन दुध तयार करण्यात येत असुन, 6 ड्रमधील केमीकल पासुन 24 हजार लिटर दुध तयार होत असल्याचे कळवले. त्यावेळी अन्न व औषध सुरक्षा अधिकारी यांनी सदर केमीकलची पाहणी केली. या छाप्यात मानवी शरीरास व जिवीतास घातक व मानवी शरीरावर विपरीत परिणाम करणारे केमिकल व पावडर आढळून आली. यावेळी एम एच 17 के. 7946 वहानातुन 200 लिटर क्षमतेचे निळ्या रंगाचे प्लास्टिक ड्रम हे जमिनीवर उतरवीत असल्याचे आढळून आले.

यामध्ये एकुण 10 प्लास्टिक ड्रम होते. त्यापैकी 4 ड्रम रिकामे व 6 ड्रममध्ये पांढऱ्या रंगाचे दुध सदृष्य लिक्विड आढळुन आले. या ठिकाणाहून 2 लाख 39 हजार 600 रु कीमतीचे 1198 लिटर Paraffin Oil, 81 हजार 56 रु किमतीचे प्लास्टिक बॅगमध्ये पांढऱ्या रंगाची 300 किलोग्रॅम पावडर, 12 हजार 160 रु कीमतीचे 320 लिटर केमिकल पासुन तयार केलेले दुध, तसेच 14 लाख रुपये कीमतीचे दोन वहाने असा एकुण 17 लाख 32 हजार 816 रुपये कीमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आले आहे. हि कारवाई पोलिस अधिक्षक सोमनाथ घार्गे व उपविभागीय पोलीस अधिकारी प्रविणचंद लोखंडे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक किरणकुमार कबाडी व जामखेड पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक दशरथ चौधरी यांच्यासह उपनिरीक्षक समीर अभंग, पोलीस अंमलदार ऱ्हदय घोडके, दिपक घाटकर, राहुल द्वारके ,गणेश लबडे ,संतोष खैरे, पोलीस नाईक शामसुंदर जाधव, भीमराज खडसे, लक्ष्मण खोकले, पोलीस कॉन्स्टेबल भाऊसाहेब काळे, अमोल कोतकर, फुरकान शेख, बिरप्पा करमल, भिमराज खर्से, राहुल डोके, सुनील मालकर, चालक अरुण मोरे, उमाकांत गाढवे, महादेव मिसाळ यांच्या पथकाने केली आहे.

# दुष्काळग्रस्त भागांत १,५०० अतिरिक्त जलसाठ्यांचे संवर्धन

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

महाराष्ट्रातील दुष्काळग्रस्त भागांमध्ये जलसंधारणाला चालना देण्यासाठी टाटा मोटर्स आणि राज्य सरकारच्या मृदा व जलसंधारण विभागामध्ये सामंजस्य करार (एमओयू) करण्यात आला आहे. या करारानुसार राज्यातील २५ जिल्ह्यांमध्ये १,५०० अतिरिक्त जलसाठ्यांचे संवर्धन करण्यात येणार असून, सार्वजनिक-खाजगी-समुदाय सहभागातून राबविण्यात येणाऱ्या जल संवर्धन उपक्रमाला अधिक बळ मिळणार आहे.

गेल्या तीन वर्षांत या उपक्रमांतर्गत १,४५० हून अधिक जलसाठ्यांचे संवर्धन करण्यात आले असून त्यातून ३,००० कोटी लिटरहून अधिक अतिरिक्त जलसाठवण क्षमता निर्माण झाली आहे. या प्रकल्पाचा लाभ ग्रामीण भागातील सुमारे सात लाख नागरिकांना झाला आहे.



जलसंधारणामुळे काही भागांत वर्षभर पाणी उपलब्ध होण्यास मदत झाली असून भूजल पातळी वाढणे आणि सिंचन सुविधा सुधारणे यासारखे सकारात्मक परिणाम दिसून आले आहेत. पुढील टप्प्यात हा उपक्रम नागपूर, अमरावती, छत्रपती संभाजीनगर, नाशिक, पुणे आणि कोकण विभागातील दुष्काळग्रस्त भागांमध्ये विस्तारला जाणार आहे. या उपक्रमाच्या विस्ताराबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले की, 'गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार' योजनेच्या माध्यमातून विकेंद्रित व समुदाय-केंद्रित उपाययोजनांद्वारे दीर्घकालीन जलसुरक्षा निर्माण करण्यासाठी राज्य सरकार कटिबद्ध आहे. टाटा मोटर्ससारख्या जबाबदार कॉर्पोरेट भागीदारामुळे भूजल पातळी वाढविणे आणि कृषी स्थैर्य निर्माण करण्याचे प्रयत्न अधिक बळकट झाले असून पाणीटंचाईच्या समस्येवर मात करण्यास मदत होत आहे.

टाटा मोटर्सचे सीएसआर प्रमुख विनोद कुलकर्णी यांनी सांगितले की, जलसंवर्धनासाठी सरकारी योजना, दीर्घकालीन भागीदारी आणि सामुदायिक सहभाग या तिन्हींच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात परिणाम साधता येत आहेत. महाराष्ट्र सरकार आणि नाम फाऊंडेशनच्या सहकार्याने ग्रामीण दुष्काळग्रस्त भागांमध्ये शाश्वत जल उपाययोजना राबविण्यावर भर दिला जाणार आहे. नाम फाऊंडेशनचे सीईओ गणेश थोरात यांनी सांगितले की, या उपक्रमामुळे ग्रामीण भागात पाण्याची उपलब्धता वाढत असून शेतकऱ्यांच्या उदरनिर्वाहात सुधारणा होत आहे. उत्खननातून निघालेला गाळ शेतात वापरला जात असून मुरूमाचा वापर शेतरस्ते तयार करण्यासाठी केला जात आहे. गावकऱ्यांचा वाढता सहभाग आणि मालकीभाव जलसंधारण प्रयत्नांना गती देत आहे. एकट्या २०२५ वर्षात कंपनीने सीएसआर अंतर्गत राज्यातील २५ जिल्ह्यांमध्ये १,००० जलसाठ्यांचे संवर्धन करून २,२५० कोटी लिटर अतिरिक्त जलसाठवण क्षमता निर्माण केली आहे. या जलसाठ्यांमुळे उन्हाळ्यात टँकरवरील अवलंबित्व कमी झाले असून पिण्याचे व सिंचनासाठी पाणी उपलब्ध झाले आहे. शेतकरी दोन पिकांची लागवड करू लागल्याने उत्पन्नात वाढ झाली आहे आणि हंगामी स्थलांतरात घट झाली आहे.



# संत रामपाल महाराज सेवा कमिटी व जनकल्याण रक्तकेंद्राचे वतीने रक्तदान शिबिराचे आयोजन

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

सतलोक आश्रम ढवळपुरी येथे १५ ,१६, १७ फेब्रुवारी रोजी जगद्गुरु तत्त्वदर्शी संत रामपाल महाराज यांच्या प्रमुख उपस्थितीत ३९ वा बोध दिवस साजरा होणार आहे.यानिमित्त हुंडा मुक्ती विवाह, भव्य रक्तदान शिबिर,थॅलेसेमिया व सिकलसेल जनजागृती, निशुल्क नाम दीक्षा व अध्यात्मिक प्रदर्शनी या स्वरूपाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमासाठी महाराष्ट्र, तेलंगणा,आंध्र प्रदेश या भागातून सुमारे दीड लाख भक्तांची उपस्थिती या सोहळ्यासाठी लाभणार आहे. या धार्मिक कार्यक्रमात संत रामपाल सेवा कमिटी व जनकल्याण रक्त केंद्राच्या वतीने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.तसेच दिव्यांगांच्या सेवेसाठी व्हीलचेअर उपलब्ध करून देण्यात आले आहे. यावेळी संत रामपाल सेवा कमिटीचे मोहनदास (नागपूर), भगवानजी पाटील (पुणे), रमेशदास (नाशिक) कैलास दास,विश्वासदास (सातारा) तसेच जनकल्याण रक्त केंद्राचे जनसंपर्क अधिकारी डॉ.विलास मढीकर,शरद बळे, गौरव पठाडे आदी उपस्थित होते.

# संत सेवालाल महाराज जन्मोत्सव सोहळा" थाटात साजरा!

**कंधार : (समर्थ गांवकरी)**

कंधार तालुक्यातील संत मिठु भुकिया महाराज गडावर बंजारा समाजाचे आराध्य दैवत जगद्गुरु "संत सेवालाल महाराज" यांच्या जन्मोत्सवाच्या निमित्ताने परिसरातील बंजारा बांधव मोठ्या संख्येने उपस्थित राहून, पारंपारिक पद्धतीने जयंती उत्सव साजरा करण्यात आला. यावेळी परिसरातील ढाकू नाईक तांडा, खेमा नाईक तांडा, गणपूर तांडा,भोजू तांडा, रामा तांडा,किशन तांडा, गणा तांडा, हिरामण तांडा,देवला तांडा यासह तालुक्यातील अनेक तांड्यातील बंजारा समाजातील नायक कारभारी, महिला भगिनी पारंपारिक वेशभूषित मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. यंदा महाशिवरात्र व संत सेवालाल महाराज जयंती ही एकाच दिवशी आल्याने भविकांसाठी देवस्थानच्या वतीने उपवासाच्या फराळाची उत्तम व्यवस्था करण्यात



आली होती. गणपूर तांडा येथून वाजंत्रीच्या गजरात वाजत गाजत पारंपारिक वेशभूषेत मिरवणूक काढण्यात आली. यावेळी गणपुर तांडा येथील तरुणांमध्ये उत्साह होता, दिवसभर उत्सहात परंपारिक नृत्य,गीत गाऊन सेवालाल महाराजांची आराधना करण्यात आली. सायंकाळी ६:०० वाजता भोग विधी व अरदास कार्यक्रम घेण्यात आला. मिठू भुकीया गड परिसरातील बंजारा समाजाला एकत्र येऊन आपले सण- उत्सव,सांस्कृतिक परंपरा जपण्यासाठी हक्काचे असल्याची भावना समाज बांधव व्यक्त करत आहेत, या वेळी आयोजक,संत सेवालाल महाराज बंजारा लमान तांडा समृद्धी योजना समितीचे अशासकीय सदस्य भगवान राठोड,श्रीराम जाधव, गुलाब राठोड, आनंद राठोड, अंकुश पवार, प्रल्हाद पवार, प्रा.नामदेव राठोड, बालाजी राठोड, विश्वनाथ पवार, रमेश जाधव, संतोष राठोड, मधुकर राठोड, शंकर जाधव, रामकिशन पवार, भीमराव राठोडयांच्या सह परिसरातील नायक कारभारी, समाज बांधव,युवक मोठया संख्येने उपस्थित होते.

# मोफत आरोग्य शिबीराचे आयोजन

**अकोले : (समर्थ गांवकरी)**

सहयाद्री कोळी महादेव सांदण परिवार महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने मोफत महाआरोग्य व रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे. शिवजयंती निमीत्ताने १९ फेब्रुवारी रोजी सांदण परिवाराच्यावतीने पट्टा किल्ल्याच्या पायथ्याशी पाचपट्टावाडी येथे सकाळी १० ते दुपारी ३ या वेळेत आयोजीत केलेल्या शिबीराचे उद्घाटन आमदार डॉ किरणजी लहामटे यांच्या शुभहस्ते होणार असून याप्रसंगी तहसीलदार डॉ. सिध्दार्थ मोरे, गरविकास अधिकारी अमर माने, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. रमाकांत शेटे, पोलीस निरीक्षक मोहन बोरसे, वनक्षेत्रपाल डोंगरे, एसएमबीटीचे व्यवस्थापक प्रविण गोसावी, वैदयकिय अधिकारी डॉ. चेतन मोरे, डॉ रमाकांत पाटील, सरपंच भगवान खोकले यासह अनेक मान्यवरांची उपस्थिती राहणार आहे.

# "शिक्षण हेच जीवन घडवणारे सामर्थ्य" – यश गायकर!

## ब्राम्हणवाड्यातील सह्याद्री विद्यालयात दहावीच्या विद्यार्थ्यांचा भावनिक सदिच्छा समारंभ उत्साहात!

**ब्राम्हणवाडा : (समर्थ गांवकरी)**

ब्राम्हणवाडा येथील सह्याद्री विद्यालय, ब्राम्हणवाडा मध्ये दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी आयोजित करण्यात आलेला सदिच्छा समारंभ अत्यंत उत्साहपूर्ण आणि भावनिक वातावरणात पार पडला. शालेय जीवनातील अविस्मरणीय क्षणांचा उजाळा देत विद्यार्थ्यांनी आणि शिक्षकांनी एकत्र येऊन हा विशेष सोहळा संस्मरणीय बनवला.

कार्यक्रमाची सुरुवात विधीवत दीपप्रज्वलनाने करण्यात आली. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून ब्राम्हणवाडा गावचे माजी उपसरपंच श्री. भारत आरोटे सर उपस्थित होते. त्यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाला औपचारिक सुरुवात झाली.



यानंतर विद्यार्थ्यांच्या मनोगतांचा हृदयस्पर्शी क्रम सुरू झाला. कु. यश संजय गायकर यांनी शिक्षणाचे महत्त्व अत्यंत प्रभावी शब्दांत विशद केले. "शिक्षण हेच जीवन घडवणारे सामर्थ्य आहे," असे सांगताना त्यांनी शिक्षकांप्रती कृतज्ञता व्यक्त केली. इतर विद्यार्थ्यांनीही शालेय जीवनातील आठवणी, मित्र मैत्रिणीं बरोबरचे क्षण, अभ्यासातील अनुभव तसेच शिक्षकांसोबत घडलेल्या गमतीजमती सांगत उपस्थितांना भावूक केले. अनेक विद्यार्थी आणि विद्यार्थिनींच्या डोळ्यांत अश्रू तरळताना दिसले.

प्रमुख पाहुणे श्री. भारत आरोटे यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात विद्यार्थ्यांना उज्ज्वल भवितव्यासाठी शुभेच्छा दिल्या. त्यांनी कठोर परिश्रम, शिस्त आणि आत्मविश्वास यांचे महत्त्व अधोरेखित केले.

"जीवनात यशस्वी व्हायचे असेल तर सतत शिकत राहा," असा संदेश त्यांनी दिला. शिक्षकवृंदांनीही विद्यार्थ्यांना पुढील शैक्षणिक प्रवासासाठी प्रेरणादायी मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी शाळेचे नाव उंचावावे, अशी अपेक्षा व्यक्त करत त्यांनी आशीर्वाद दिले.

शेवटी आभार प्रदर्शनाने कार्यक्रमाची सांगता झाली. दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी हा सदिच्छा समारंभ केवळ निरोपाचा कार्यक्रम न राहता, आयुष्यभर स्मरणात राहील असा भावनिक आणि प्रेरणादायी क्षण ठरला.

# गुरुवर्य जंगले शास्त्री महाराजांचा ७७ वा वाढदिवस उत्साहात साजरा

**अहिल्यानगर: (समर्थ गांवकरी)**

अहिल्यानगर तालुक्यातील ब्रह्मगिरी पर्वतरांगेत वसलेले, पौराणिक काळातील सीतेची न्हाणी म्हणून प्रसिद्ध आणि भगवान महादेवाचे स्वयंभू देवस्थान असलेल्या श्री क्षेत्र डोंगरगण येथे ज्ञानेश योग आश्रमाचे मुख्य गुरुवर्य हरिभक्त परायण जंगले शास्त्री महाराज यांच्या ७७ व्या वाढदिवसानिमित्त अभिष्टचिंतन सोहळा मोठ्या थाटामाटात पार पडला. यावेळी महाराजांनी ७७ व्या वर्षात पदार्पण केले. त्यांच्या कार्याचा गौरव म्हणून 'देह कष्टविती परोपकारे' या जीवनपरिचयात्मक ग्रंथाचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. या ग्रंथाचे लेखन व लेखसंकलन प्रगती सुधाकर पवार यांनी केले आहे. पुस्तकाचे प्रकाशन आमदार संग्राम जगताप, महापौर ज्योती गाडे, उपमहापौर धनंजय जाधव तसेच अहिल्यानगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक



अक्षय कर्डीले यांच्या हस्ते झाले. यावेळी आमदार संग्राम जगताप यांनी आपल्या भाषणात जंगले शास्त्री महाराज यांच्या अध्यात्मिक कार्याचा गौरव करताना सांगितले की, "भागवत धर्माची पताका संपूर्ण देशभरात फडकावण्याचे कार्य महाराजांनी केले आहे. त्यांच्या शिष्यवृंदाचा विस्तार देशाच्या कानाकोपऱ्यात आहे. महाराष्ट्रात आणि देशभरातील अनेक भगवाधारी संतांचे ते मार्गदर्शक गुरू आहेत. डोंगरगणसारख्या पुण्यभूमीत त्यांचे संपूर्ण जीवनकार्य घडले, ही आपल्या सर्वांसाठी अभिमानाची बाब आहे." ग्रामीण भागातील शेतकऱ्यांप्रमाणेच ही भूमीही अध्यात्माच्या कार्याने अधिक सुपीक झाली असून, महाराजांच्या महान धार्मिक कार्यामुळे या भूमीचा सातत्याने गौरव होत असल्याचेही त्यांनी नमूद केले. महाशिवरात्रीच्या पावन दिनी महाराजांचा वाढदिवस असतो. त्यानिमित्त त्यांचा अभिष्ट चिंतन सोहळा आणि संपूर्ण सप्ताहकालात महाशिवरात्र महोत्सव याठिकाणी दरवर्षी आयोजित केला जातो. काल या सोहळ्याचा पहिला दिवस होता. त्यानिमित्त महाराजांचे जाहीर हरिकीर्तन झाले. ते म्हणाले काम क्रोध ,लोभ आदी षडरिपूचा नाश करण्यासाठी ईश्वराचे नामस्मरण उपयोगी पडते. शास्त्र पुराणातील दाखले देऊन त्यांनी हा मुद्दा विशद केला. कार्यक्रमास भागवत महाराज जंगले, सचिन देशमुख, वडगाव गुप्ता चे सरपंच विजय शेवाळे, माजी सरपंच बबनराव पटारे, मांजरसुंबा सरपंच जालिंदर कदम, वडगाव गुप्ता सरपंच विजय शेवाळे, सर्जेराव मते, डोंगरगडच्या सरपंच वैशालीताई मते, शिवाजी चव्हाण, प्रगती पवार, सुधाकर पवार, गणेश आर्टचे मुकुंद दळवी, गणेश दळवी यांसह अनेक मान्यवर व भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. डोंगरगण येथील ज्ञानेश योग आश्रम परिसरात भक्तिमय वातावरणात हा सोहळा संपन्न झाला. गुरुवर्य जंगले शास्त्री महाराज यांना वाढदिवसानिमित्त उपस्थितांनी शुभेच्छा देत त्यांच्या निरोगी व दीर्घायुष्यासाठी प्रार्थना केली. सूत्रसंचालन संदीप महाराज यांनी केले.

# तरुण शेतकऱ्याची आत्महत्या

**नायगाव : (समर्थ गांवकरी)**

तालुक्यातील मांजरम येथील तरुण शेतकरी तानाजी माधवराव पुंजाजी (वय ३८) यांनी सततच्या नापिकीला कंटाळून गळफास घेऊन आत्महत्या केल्याची दुर्दैवी घटना १५ फेब्रुवारीच्या दुपार नंतर उघडकीस आली. या घटनेमुळे मांजरम परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. मिळालेल्या माहितीनुसार, तानाजी पुजाजी हे शेतीवर उदरनिर्वाह करणारे कष्टकरी शेतकरी होते. मागील काही हंगामांपासून सततचे हवामान बदल, पावसाचे अनियमित प्रमाण व पिकांचे होणारे नुकसान यामुळे त्यांना मोठा आर्थिक फटका बसला होता. सततच्या नापिकीमुळे निर्माण झालेल्या नैराश्यातून त्यांनी गावातील विठ्ठल मंदिराशेजारी असलेल्या त्यांच्या राहत्या घरी १४ च्या रात्री च्या सुमारास दुसऱ्या मजल्यावर जाऊन गळफास घेऊन जीवन संपविले.

# वाटा संघर्षाच्या राजेंद्र उदागे गौरव ग्रंथाचे शनिवारी प्रकाशन

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

शब्दगंध साहित्यिक परिषद, महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने शब्दगंधचे अध्यक्ष तथा नंदराज केटरर्सचे संचालक राजेंद्र उदागे यांच्या कार्याचा गौरव करणाऱ्या "वाटा संघर्षाच्या : राजेंद्र उदागे गौरव ग्रंथ" या विशेष ग्रंथाचे प्रकाशन शनिवार दि. २१ फेब्रुवारी रोजी दुपारी ४ वाजता जाधव लॉन्स, अहिल्यानगर येथे आयोजित करण्यात आले आहे, अशी माहिती शब्दगंध चे संस्थापक सुनील गोसावी यांनी दिली. सामाजिक कार्यकर्ते बापूसाहेब भोसले यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या या प्रकाशन सोहळ्यास आमदार संग्रामभैया जगताप,आमदार मोनिकाताई राजळे,माजी आमदार व ज्येष्ठ साहित्यिक लहू कानडे, अहिल्यानगर च्या महापौर ज्योतीताई गाडे, उपमहापौर धनंजय जाधव, पाथर्डी नगरपरिषदेचे नगराध्यक्ष अभय आव्हाड,ज्येष्ठ साहित्यिक डॉ. संजय कळमकर, राष्ट्रवादी काँग्रेसचे




शहर जिल्हाध्यक्ष संपतदादा बारस्कर,संत साहित्य अभ्यासक गोरक्षनाथ महाराज उदागे यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे.

याशिवाय कॉ. बाबा आरगडे, प्रा. मधुसूदन मुळे, जयंत येलूलकर,जयंतभैया जाधव आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत. सुनील गोसावी संपादित या गौरव ग्रंथामध्ये राजेंद्र उदागे यांनी स्वतः लिहिलेला आत्मचरित्रात्मक लेख समाविष्ट असून कविवर्य प्रकाश घोडके, शशिकांत नजान,प्रा. सिताराम काकडे, प्राचार्य चंद्रकांत भोसले, डॉ.शेषराव पठाडे प्रा. डॉ.बाबुराव उपाध्ये,सुमेध ब्राह्मणे,डॉ. सुनीलकुमार सरनाईक,श्रीनिवास बोजा, डॉ. जी. पी. ढाकणे, ज्ञानदेव पांडुळे, सुभाष सोनवणे,डॉ. संजय सुकाळकर,संदीप रोडे, डॉ. अनिल गर्जे, प्रा.डॉ.किशोर धनवटे, शर्मिला रूपटक्के, मकरंद घोडके,विनोद शिंदे, अमोल उदागे,सौ. मीरा उदागे यांच्यासह अनेक मान्यवरांचे लेख समाविष्ट आहेत.या लेखांमधून राजेंद्र उदागे यांच्या सामाजिक,साहित्यिक आणि व्यावसायिक वाटचालीचा संघर्षमय प्रवास उलगडण्यात आला आहे. या गौरव ग्रंथ प्रकाशन सोहळ्यास साहित्यिक, साहित्य रसिक तसेच सर्व मित्रपरिवाराने मोठ्या संख्येने उपस्थित राहावे,असे आवाहन भगवान राऊत, शाहीर भारत गाडेकर, बबनराव गिरी, रवींद्र दानापुरे, शर्मिला गोसावी, राजेंद्र फंड, राजेंद्र चोभे, प्रा. डॉ. अशोक कानडे, प्रशांत सूर्यवंशी, स्वाती ठुबे, जयश्री झरेकर, शेवगाव तालुका शाखा अध्यक्ष हरिभाऊ नजन,कोरगाव सौ. ऐश्वर्यलक्ष्मी सातभाई, आष्टी तालुका शाखा अध्यक्ष बाळासाहेब शेदूरकर यांनी केले आहे.

# प्रा. डॉ. अनिकेत साळवे यांना पीएच. डी. पदवी प्रदान

**श्रीगोंदा : (समर्थ गांवकरी)**

मा. वाहतूक नियंत्रण, रा. पा. श्रीगोंदा आगार येथील विनायक गोविंदा साळवे यांचे सुपुत्र प्रा. डॉ. अनिकेत विनायक साळवे यांना मेकॅनिकल इंजिनिअरिंग शाखेत पीएच.डी. पदवी प्रदान करण्यात आली आहे. त्यांच्या या शैक्षणिक यशामुळे श्रीगोंदा तालुक्यात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. प्रा. डॉ. अनिकेत साळवे हे सध्या पुणे येथील विश्वकर्मा इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी (VIT)च्या यांत्रिकी अभियांत्रिकी विभागात सहाय्यक प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत. त्यांनी 2008 मध्ये सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातून एम.ई. पदवी संपादन केली होती. त्यानंतर त्यांनी संशोधन क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करत पीएच.डी. पदवी प्राप्त केली.



"Investigation on Natural Fiber Based Hybrid Composites with Metallic Reinforcement under Static and Impact Loading" या विषयावरील त्यांचा संशोधन प्रबंध नैसर्गिक तंतूवर आधारित समिश्र पदार्थांच्या गुणधर्मांचा स्थिर व आघाती भाराखाली सखोल अभ्यास करणारा आहे. त्यांच्या संशोधनासाठी डॉ. मचे यांचे मार्गदर्शन लाभले.

प्रा. डॉ. अनिकेत साळवे यांच्या या यशाबद्दल सहकारी संस्थांचे संचालक, शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवर तसेच विविध स्तरांतील पदाधिकारी यांनी त्यांचे अभिनंदन करून कौतुक व्यक्त केले आहे.

# एएम/एनएस इंडियाचा 'व्हायब्रन्स' आणि 'ऑप्टिमा' ब्रँडसह मूल्यवर्धित स्टील पोर्टफोलिओ विस्तार

**मुंबई/दिल्ली : (समर्थ गांवकरी)**

आर्सेलॉरमित्तल निप्पॉन स्टील इंडिया (एएम/एनएस इंडिया)ने पॉवर अप्लायन्स आणि इंडस्ट्रियल मॅन्युफॅक्चरिंग क्षेत्रासाठी 'व्हायब्रन्स' आणि 'ऑप्टिमा' या जागतिक दर्जाच्या ब्रँडेड ऑफरिंग्जसह आपल्या मूल्यवर्धित स्टील पोर्टफोलिओचा विस्तार करण्याची घोषणा केली आहे. उभरत्या ओरिजिनल इक्विपमेंट मॅन्युफॅक्चरर्स (ओईएम्स)च्या डिझाइन-आधारित गरजा लक्षात घेऊन ही उत्पादने विकसित करण्यात आली आहेत.

सरफेस प्रीसिजन, आकर्षक फिनिश आणि उत्पादन प्रक्रियेतील विश्वासार्हता यासाठी उद्योगांमध्ये उच्च दर्जाच्या स्टीलची मागणी सातत्याने वाढत आहे. या पार्श्वभूमीवर एएम/एनएस इंडिया प्रीमियम, आंतरराष्ट्रीय स्तरावर बेंचमार्क असलेली गुणवत्ता




देशांतर्गत उपलब्ध करून देत आयातीवरील अवलंबित्व कमी करण्याचा प्रयत्न करत आहे. 'व्हायब्रन्स' आणि 'ऑप्टिमा' ही कोटेड स्टील उत्पादने कंपनीच्या विद्यमान मूल्यवर्धित पोर्टफोलिओचा भाग असून त्यामध्ये Optigal® Magnelis®, Optigal® Prime आणि Optigal® Pinnac यांसारख्या उत्पादनांचाही समावेश आहे.

एएम/एनएस इंडियाचे डायरेक्टर व व्हाइस प्रेसिडेंट (सेल्स अँड मार्केटिंग) रंजन धर म्हणाले की, ओईएम उद्योगांसाठी सामग्रीची निवड ही उत्पादकता, खर्च आणि दीर्घकालीन कामगिरीवर थेट परिणाम करणारी असते. 'व्हायब्रन्स' आणि 'ऑप्टिमा' या नवीन ऑफरिंग्जमुळे ओईएमना उच्च दर्जाचे स्टील सोल्यूशन्स उपलब्ध होणार असून 'मेक इन इंडिया' आणि 'आत्मनिर्भर भारत' या संकल्पनांना बळ मिळणार आहे. देशांतर्गत स्तरावर जागतिक दर्जाचे मूल्यवर्धित स्टील उपलब्ध करून देत ग्राहकांना जागतिक स्पर्धेत सक्षम करण्याचा कंपनीचा उद्देश असल्याचे त्यांनी सांगितले.

'एएम/एनएस व्हायब्रन्स' हे अप्लायन्स उत्पादकांसाठी विकसित केलेले प्रीमियम कलर-कोटेड स्टील असून त्यात मजबुती, अचूकता आणि उत्कृष्ट पृष्ठभाग सौंदर्याचा संगम आहे. प्रगत कोटिंग तंत्रज्ञानामुळे फॅब्रिकेशनपासून अंतिम वापरापर्यंत टिकाऊ आणि विश्वासार्ह कामगिरी मिळते. रेफ्रिजरेटर, वॉशिंग मशीन, मायक्रोवेव्ह ओव्हन, वॉटर डिस्पेंसर यांसारख्या उपकरणांसाठी हे स्टील उपयुक्त ठरणार आहे. तर 'एएम/एनएस ऑप्टिमा' हे ट्रू झिरो-स्पँगल गॅल्वनाइज्ड स्टील उत्पादन असून त्यामध्ये पृष्ठभागावरील समानता आणि नियंत्रित गुणवत्ता अधिक प्रभावी आहे. एकसमान जाडी, नियंत्रित पृष्ठभाग आणि सातत्यपूर्ण कामगिरीमुळे उत्पादकांना स्वच्छ व अचूक फिनिश मिळवणे सोपे होते. एसी आउटडोअर युनिट्स, पॅनेल्स आणि क्लीनरूम इंस्टॉलेशन्ससाठी हे स्टील उपयुक्त आहे. भारतातील ग्राहकोपयोगी वस्तूंची बाजारपेठ आर्थिक वर्ष २०२७ पर्यंत जगातील चौथ्या क्रमांकाची मोठी बाजारपेठ होण्याचा अंदाज असून प्रीमियम उत्पादनांची मागणी वेगाने वाढत आहे. सध्या देशातील कोटेड स्टीलची वार्षिक मागणी सुमारे ११.१ दशलक्ष टन असून पुढील काही वर्षांत ती ८ ते १० टक्के दराने वाढण्याचा अंदाज आहे. अप्लायन्स क्षेत्रात ग्राहकांच्या बदलत्या अपेक्षा, शहरीकरण, प्रीमियम उत्पादने आणि पीएलआय योजनेमुळे दरवर्षी सुमारे १० टक्के वाढ होत आहे. इंडस्ट्रियल ॲप्लिकेशन्समध्येही २०३० पर्यंत कोटेड स्टीलची मागणी ८ ते १२ टक्के दराने वाढण्याची शक्यता आहे. सरकारी धोरणे, स्वावलंबन उपक्रम आणि ऑटोमोटिव्ह, इलेक्ट्रॉनिक्स व इंजिनीयरिंग क्षेत्रातील विस्तार यामुळे या वाढीस चालना मिळणार आहे. अप्लायन्स आणि इंडस्ट्रियल क्षेत्रे मिळून देशाच्या उत्पादन क्षेत्रातील वाढीसाठी कोटेड स्टीलचे धोरणात्मक महत्त्व अधोरेखित करतात. उच्च दर्जाचे मूल्यवर्धित स्टील भारताच्या उत्पादन क्षमतेला बळ देण्यासाठी निर्णायक ठरणार असल्याचे तज्ज्ञांचे मत आहे. आर्सेलॉरमित्तल निप्पॉन स्टील इंडिया ही आर्सेलॉरमित्तल आणि निप्पॉन स्टील या जागतिक अग्रगण्य स्टील उत्पादक कंपन्यांची संयुक्त भागीदारी असून कंपनी भारतातील प्रमुख इंटिग्रेटेड फ्लॅट स्टील उत्पादकांपैकी एक आहे.